**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : ०४**

नगरसचिव कार्यालय
दिनांक : २३ /८/२०१७

प्रति,
मा. ------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र - ४ सोमवार दि. २८/ ०८/२०१७ रोजी दुपारी १.००वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**सोमवार दिनांक २८/०८/२०१७ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| २९ | अहमदनगर महानगरपालिकेचे वैद्यकीय अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात स्टाफ नर्स यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे करीता पुर्व मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ३० | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक , विजतंत्री यापदी तांत्रिबक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ३१ | अहमदनगर महानगरपालिकेच्या आर.सी.एच. फेज-२ अंतर्गत योजनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना तांत्रिक खंड देवून पुर्ननियुक्ती करणेस व किमान वेतनानुसार मानधन अदा करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ३२ | अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक १, २, ३ व ४ करिता मधील कचरा संकलन व वाहतुक करणे करीता मंजुर वार्षिक सन २०१७-२०१८ च्या मंजुर दरानुसार मजुर उपलब्ध करून घेणे मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३३ | अहमदनगर शहर बससेवा उपक्रम अभिकर्ता संस्था मे. यशवंत ऑटो प्रा.लि. यांचे असमाधानकारक सेवेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ३४ | अहमदनगर महानगरपलिका विद्युत विभागाकरिता मोटार व्हेईकल विभागामार्फत ई निविदा राबवून २ नग हायड्रोलिक गाडी खरेदी करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३५ | अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागामध्ये Cryoprecipitate व Single Donor Plateletes by Apheresis या रक्तघटकांचे दर निश्चिती बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ३६ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत कलम ३८१ व ३८२ अन्वये मांस विक्रेतांना परवाने देण्यांबाबत ऑफिस रिपोर्ट. |

PTO

| | |
|---|---|
| ३७ | अहमदनगर महानगरपालिकेचे उघडयावर शौचास बसणेकामी प्रतिबंध करणा-या कामी नेमणुक करण्यात आलेल्या पथकामार्फत दंडात्मक कारवाईत प्राप्त रक्कमेचा निम्मा हिस्सा (निम्मी रक्कम) गुडमॉर्निंग पथकातील कर्मचा-यास प्रदान करणेबाबत ऑफिस रिपोर्ट |
| ३८ | अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतुन फिरते शौचालय -१० सीटचे (५ पुरूष व ५ स्त्री) ट्रॅक्टर ट्रॉली पध्दतीचे -२ नग खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १४४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ३९ | अहमदनगर महानगरपालिका विविध विभागा कडील जुने निरूपयोगी भंगार साहित्य गअ क्र.३ ते ५ मध्ये नमुद प्रमाणे विक्री करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुं बई प्रांतिक महानगरपालिका ७३(ड) अन्वये माहिती बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४० | मालमत्ता धारक श्री.गांधी सुरेशलाल मोहनलाल प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२३ मार्कंडेय मार्ग स्टेशन रोड,यांना बील क्र.४२८ व ४३६ ही एकच मालमत्ता असून एका मालमत्तेचे दुबार बिल येत असल्याने ओपन प्लॉट वरील बील क्र.४२८ वरील रू.३४८१७/- निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ४१ | अहमदनगर महानगरपालिकेचे अर्जदार श्री.दिनेश पोपटलाल कटारीया यांनी गंजबाजार भाजीमार्केट मधील गाळा क्र.१३६ नांवावर हस्तांतर होणेबाबत दरमहा भाडे , अनामत रक्कम व हस्तांतरण फी रक्कम भरून घेउन कराराने देणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ४२ | अहमदनगर महानगरपालिका यांच्या मंजुरीने सावेडी जुने बसस्थानक बिल क्रमांक ७८९ वर आकारणी करण्यात आलेली घरपटटीची रक्कम रूपये ५३,२६,५२१/- शास्तीसह रक्कम निर्लेखित करणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** विषय क्रमांक- २९ ते ४२ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- २९ सोमवार दि.२८/०८/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे वैद्यकीय अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात स्टाफ नर्स यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे करीता पुर्व मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ :- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवाखाना २४४ दि.८/६/२०१७ अन्वयेचा प्रस्ताव

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, कै.बा. दे. दवाखाना व सुतिका गृह यांनी त्यांचेकडील जा.क्र. कै.बा.दे. दवाखाना २४४ दिनांक ०८/०६/१७ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "जा.क्र. आस्थापना करारबध्द नेमणुक ३२८ दिनांक २६/४/१७ अन्वये १] सौ. रेखा रमेश अमोलिक, २] सौ. निलिमा सतिष हिवाळे, ३] सौ. शितल गंगाराम शिंदे, ४] सौ. तृप्ती रावसाहेब यांची परिचारिका या पदावर दरमहा रू.८०००/- मानधनावर करारबध्द पध्द्दतीने दिनांक ३१/१२/२०१६ पासून सहा महिन्यांकरिता कै.बा.दे. दवाखाना येथे नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांचा नेमणूकीचा कालावधी दिनांक ३०/६/२०१७ रोजी संपत आहे. त्यांनी पुढील कालावधीसाठी पुनर्नेमणूक करणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. १] सौ. रेखा रमेश अमोलिक, २] सौ. निलिमा सतिष हिवाळे, ३] सौ. शितल गंगाराम शिंदे, ४] सौ. तृप्ती रावसाहेब यांना नियमाप्रमाणे तांत्रिक खंड देउन दिनांक ३/७/२०१७ पासून सहा महिन्याकरिता कै.बा. दे. दवाखानासाठी परिचारीका या पदावर तात्पुरत्या स्वरूपात करार बध्द पध्दतीने पुनर्नेमणूक करणेस शिफारस आहे. असे नमुद केलेले असुन मा.उपायुक्त (कर) उपरोक्त नुसार मान्यतेस्तव सादर" असा अभिप्राय दिलेला आहे.

तरी १] सौ. रेखा रमेश अमोलिक, २] सौ. निलिमा सतिष हिवाळे, ३] सौ. शितल गंगाराम शिंदे, ४] सौ. तृप्ती रावसाहेब यांचा जा.क्र. ३२८ दिनांक २६/४/२०१७ अन्वये दिनांक ३१/१२/२०१६ ते ३०/६/२०१७ अखेर तात्पुरत्या नियुक्तीचा कालावधी दिनांक २/७/२०१७ रोजी समाप्त झालेला असुन जा.क्र. कै.बा.दे.दवाखाना २४४ दिनांक ०८/०६/२०१७ रोजीच्या अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार कै.बा.दे. दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुत्या स्वरूपात परिचारीका यादी १] सौ. रेखा रमेश अमोलिक, २] सौ. निलिमा सतिष हिवाळे, ३] सौ. शितल गंगाराम शिंदे, ४] सौ. तृप्ती रावसाहेब यांची तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक ३/७/२०१७ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये ८०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे करीता सदरचा प्रस्ताव मा.मुख्य लेखा परिक्षक व मा. मुख्यलेखा अधिकारी यांचा अभिप्राय घेणे आवश्यक आहे. तथापी आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे प्रभाग अधिकारी तथा सहा. आयुक्त यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सहमती दर्शक सही

यावर मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, १. प्रस्तावीत "अ" नुसार कार्यवाही करणेस हरकत नसावी , २. आस्थापना तरतुदीनुसार कार्यवाही जबाबदारी संबंधीत विभागाची राहील व याबाबत खात्री करणे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, स्टाफ नर्स बाबत तांत्रिक खंड देवून मा.स्थायी समिती मान्यतेसाठी पाठविणे उचित होईल.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढेसादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- नगरसचिवांनी सर्व खाते प्रमुख व शाखाप्रमुख यांची ओळख करून दयावी.

सर्व खाते प्रमुख व शाखा प्रमुख यांनी आपली ओळख करून दिली.

मा.बाळासाहेब बोराटे :- आस्थापना विभागाने सांगावे की ही प्रस्तावातील पदे आकृतीबंध मध्ये आहेत का? मानधनावर किती दिवस नर्स भरणार.

आस्थापना विभाग :- आकृतीबंधामध्ये मंजूर आहेत.बिंदू नामावलीची अडचण आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- २९ व ३१ नंबरचा जो विषय आहे.भांडवली खर्च आपला वाढणार आहे.आर.सी.एच.करीता पुर्वी निधी मिळत होता.आता हा खर्च महानगरपालिकेला करावा लागणार आहे.बिंदू नामावली करीता ३४ टक्के आस्थापना खर्चाची अट घातली आहे.आपण जर नुसतेचे कर्मचारी घेत राहिलो तर हा खर्च आटोक्यात केव्हा येणार.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- अतिरिक्त स्टाफ करीता आपण २००६ मध्ये मंजूर करून घेतले आहे.लसिकरणाचे काम हे कर्मचारी पहातात.सन २००६ च्या ठरावामध्ये शासनाने मंजूरी २०१० पर्यत मंजूरी दिली होती.बिंदू नामावली मध्ये ही पदे मंजूर केलेली नाही.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- ३० टक्के खर्चाची मर्यादा जोपर्यत येत नाही तो पर्यत करता येत नाही.सध्या आपला आस्थापना खर्च ७५ टक्के आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ७५ टक्के आस्थापना वरील खर्च ३५ टक्के पर्यत कसा येणार ते सांगा.

मा.आयुक्त साहेब :- परिचारीका या पदामध्ये सॅक्शन पदे कीती?आपली जी मंजूर सूची आहे ती रिक्त असल्याने मानधावरील कर्मचारी घेता येतात.

मा.बाळासाहेब बोराटे :- स्टॅपींग पॅटर्न मंजुर झालेला आहे.त्यानुसार पदे केव्हा भरणार .

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- केडर नं.१ व २ करीता मंजूरी आलेली आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ज्या पदांना मंजुरी आलेली आहे ती पदे का भरत नाही.आज बांधकाम विभाग,पाणीपुरवठा विभाग,इलेक्ट्रीक विभागांमध्ये इंजीनियर नाहीत.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- मा.शासनाकडे प्रस्ताव लवकरच पाठविणार आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात व्हिजीट दिली असता.जो दवाखाना नेहमी गजबजलेला असतो.त्याठिकाणी फक्त २ च पेशंट होते ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- आपल्याकडे भुलतज्ञ कॉल बेसीसवर येतात.त्यांचे पेमेंट का निघत नाही.तुम्ही बिल का पाठवत नाही.

लेखाअधिकारी श्री.झिरपे :- १५ ते २० लाखांची बिले आहेत.सध्या ४ लाख रूपयांची बिले निघाली आहे.

मा.आयुक्त साहेब :- आस्थापना विभाग प्रमुख,उपायुक्त,वैदयकिय आरोग्य अधिकारी,यांच्याशी चर्चा करून पदे भरणे आवश्यक असून कायम पद भरण्यासाठी मंजूरी मिळत नाही.जरी आस्थापना खर्च ३५ टक्के पेक्षा जास्त असला तरी अत्यावश्यक बाब म्हणून प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आयुक्त साहेब जर दवाखाना बंद पडला तर याचे खापर सगळयांवर फुटणार आहे.दवाखान्यामध्ये स्टाफ आवश्यक आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- कायम स्वरूपी भुलतज्ञ व अन्य आवश्यक स्टाफ भरती करण्यात यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रीकेतील विषय क्र.२९ व ३० ऑफिस रिपोर्ट मंजूर.मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस पुर्व मंजुरीस ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे वैद्यकीय अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात स्टाफ नर्स यापदी यादी १] सौ. रेखा रमेश अमोलिक, २] सौ. निलिमा सतिष हिवाळे, ३] सौ. शितल गंगाराम शिंदे, ४] सौ. तृप्ती रावसाहेब यांची तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस पुर्व मंजुरीस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४

विषय क्रमांक- ३० सोमवार दि.२८/०८/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक , विजतंत्री यापदी तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ :- पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र. ४४० दिनांक १५/७/२०१७ अन्वयेचा प्रस्ताव

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र. ४४० दिनांक १५/७/२०१७ अन्वयेचा प्रस्ताव सादर करून त्यामध्ये अहमदनगर महानगरपालिकेमध्ये पाणीपुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार खालील नमुद तांत्रिक हुद्दाप्रमाणे तातपुत्या स्वरूपात पदांवर दि.३०/१/२०१७ रोजी पासुन ६ महिन्याकरिता निर्देशित अटी शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणुका करण्यात आलेल्या आहेत.

संदर्भिय आदेशातील पाणी पुरवठा विभागाकरीता नियुक्त केलेले सर्व कर्मचारी या विभागाकडे हजर झाल्यानंतर सर्वाची अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवर खालील निर्देशित ठिकाणी नेमणूक करण्यात आलेली होती.

परंतू कंत्राटी करारानुसार नेमणूक केलेल्या कर्मचा-यांची मुदत दि.१/८/२०१७ रोजी संपुष्टात येणार आहे व मुदतवाढ मिळणेकामी खालील नमुद कर्मचारी यांनी दि.१२/०६/२०१७ रोजी इकडेस विनंती अर्ज दिलेला आहे.

तसेच सदरहू कर्मचा-यांची आवश्यकता असलेबाबत योजने वरील वीजतंत्री श्री. मुळे यांनी दि.१९/६/२०१७ रोजी इकडेस रिपोर्ट देवुन कळविले आहे.

यास्तव पाणीपुरवठा विभागाकरीता मोठया प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नाव | हुद्दा | नेमणूक ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | संदिप प्रभाकर पुंड | पंपचालक | विळद पंपींग स्टेशन |
| २ | सोनवणे मनिष कैलास | वीजतंत्री | विळद पंपींग स्टेशन |
| ३ | सागर दिलीप जाधव | पंपचालक | विळद पंपींग स्टेशन |
| ४ | गणेश बाबाजी शिंदे | पंपचालक | विळद पंपींग स्टेशन |
| ५ | राजेश पुंडलिक टाकळकर | पंपचालक | विळद पंपींग स्टेशन |
| ६ | गहिनीनाथ अंबादास मेने | पंपचालक | विळद पंपींग स्टेशन |

तरी १] श्री संदिप प्रभाकर पुंड, २] श्री सोनवणे मनिष कैलास ,३] श्री सागर दिलीप जाधव , ४] श्री गणेश बाबाजी शिंदे, ५] श्री राजेश पुडलिक टाकळकर , ६] श्री गहिनीनाथ अंबादास मेने यांचा जा.क्र. आस्था. ११९२ दिनांक २८/६/२०१७ अन्वये दिनांक ३०/०१/२०१७ ते ३१/७/२०१७अखेर तात्पुरत्या नियुक्तीचा कालावधी दिनांक १/८/२०१७ रोजी समाप्त झालेला असुन जा.क्र.पाणी पुरवठा ४४०दिनांक १५/७/२०१७ रोजीच्या अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेसाठी करार नुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक व विजतंत्री यादी १] श्री संदिप प्रभाकर पुंड, २] श्री सोनवणे मनिष कैलास, ३] श्री सागर दिलीप जाधव, ४] श्री गणेश बाबाजी शिंदे ,५] श्री राजेश पुंडलिक टाकळकर ,६] श्री गहिनीनाथ अंबादास मेने यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून दिनांक ४/८/२०१७ पासून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे ९०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्बाबत मा. मुख्य लेखा परिक्षक व मा.मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणेस प्रस्ताव मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे प्र. सहा. आयुक्त यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा मु.ले.प.

यावर मुख्यलेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, मु.ले. अ. यांचा अभिप्राय घेउन सादर करा.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्रय की, प्रस्तावीतानुसार सादर.

यावर मुख्य लेखा अधिकारी / मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, मु.ले. अ. यांचे अभिप्रायानुसार प्रस्तावीत अ नुसार कळथ्वणे करणेस हरकत नसावी. मनपातील मागील सेवा कोणत्याही कारणास्तव मनपात कायम नियुक्ती आणि विचारात होणारी जाणार नाही असे हमीपत्र घेउनच वरील "अ" प्रमाणे उचित निर्णय दयावा.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.आयुकत साहेब यांचा अभिप्राय की, मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- नगरसचिवांनी सर्व खाते प्रमुख व शाखाप्रमुख यांची ओळख करून दयावी.

सर्व खाते प्रमुख व शाखा प्रमुख यांनी आपली ओळख करून दिली.

मा.बाळासाहेब बोराटे :- आस्थापना विभागाने सांगावे की ही प्रस्तावातील पदे आकृतीबंध मध्ये आहेत का? मानधनावर किती दिवस नर्स भरणार.

आस्थापना विभाग :- आकृतीबंधामध्ये मंजूर आहेत.बिंदू नामावलीची अडचण आहे.

मा.बाळासाहेब बोराटे:- २९व ३१ नंबरचा जो विषय आहे.भांडवली खर्च आपला वाढणार आहे. आर.सी.एच.करीता पुर्वी निधी मिळत होता.आता हा खर्च महानगरपालिकेला करावा लागणार आहे.बिंदू नामावली करीता ३४ टक्के आस्थापना खर्चाची अट घातली आहे.आपण जर नुसतेचे कर्मचारी घेत राहिलो तर हा खर्च आटोक्यात केव्हा येणार.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- अतिरिक्त स्टाफ करीता आपण २००६ मध्ये मंजूर करून घेतले आहे.लसिकरणाचे काम हे कर्मचारी पहातात.सन २००६ च्या ठरावामध्ये शासनाने मंजूरी २०१० पर्यत मंजूरी दिली होती.बिंदू नामावली मध्ये ही पदे मंजूर केलेली नाही.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- ३० टक्के खर्चाची मर्यादा जोपर्यत येत नाही तो पर्यत करता येत नाही.सध्या आपला आस्थापना खर्च ७५ टक्के आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ७५ टक्के आस्थापना वरील खर्च ३५ टक्के पर्यत कसा येणार ते सांगा.

मा.आयुक्त साहेब :- परिचारीका या पदामध्ये सॅक्शन पदे कीती?आपली जी मंजूर सूची आहे ती रिक्त असल्याने मानधावरील कर्मचारी घेता येतात.

मा.बाळासाहेब बोराटे :- स्टॅपींग पॅटर्न मंजुर झालेला आहे.त्यानुसार पदे केव्हा भरणार .

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- केडर नं.१ व २ करीता मंजूरी आलेली आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ज्या पदांना मंजुरी आलेली आहे ती पदे का भरत नाही.आज बांधकाम विभाग,पाणीपुरवठा विभाग,इलेक्ट्रीक विभागांमध्ये इंजीनियर नाहीत.

आस्थापना विभाग प्रमुख श्री.लहारे :- मा.शासनाकडे प्रस्ताव लवकरच पाठविणार आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात व्हिजीट दिली असता.जो दवाखाना नेहमी गजबजलेला असतो.त्याठिकाणी फक्त २ च पेशंट होते ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- आपल्याकडे भुलतज्ञ कॉल बेसीसवर येतात.त्यांचे पेमेंट का निघत नाही.तुम्ही बिल का पाठवत नाही.

लेखाअधिकारी श्री.झिरपे :- १५ ते २० लाखांची बिले आहेत.सध्या ४ लाख रूपयांची बिले निघाली आहे.

मा.आयुक्त साहेब :- आस्थापना विभाग प्रमुख,उपायुक्त,वैदयकिय आरोग्य अधिकारी,यांच्याशी चर्चा करून पदे भरणे आवश्यक असून कायम पद भरण्यासाठी मंजूरी मिळत नाही.जरी आस्थापना खर्च ३५ टक्के पेक्षा जास्त असला तरी अत्यावश्यक बाब म्हणून प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आयुक्त साहेब जर दवाखाना बंद पडला तर याचे खापर सगळयांवर फुटणार आहे.दवाखान्यामध्ये स्टाफ आवश्यक आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- कायम स्वरूपी भुलतज्ञ व अन्य आवश्यक स्टाफ भरती करण्यात यावी.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- विषय पत्रीकेतील विषय क्र.२९ व ३० ऑफिस रिपोर्ट मंजूर.मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस पुर्व मंजुरीस ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेसाठी करार नुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक व विजतंत्री १] श्री संदिप प्रभाकर पुंड, २] श्री सोनवणे मनिष कैलास, ३] श्री सागर दिलीप जाधव, ४] श्री गणेश बाबाजी शिंदे ,५] श्री राजेश पुंडलिक टाकळकर ,६] श्री गहिनीनाथ अंबादास मेने यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ३१ सोमवार दि.२८/०८/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या आर.सी.एच. फेज-२ अंतर्गत योजनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना तांत्रिक खंड देवून पुर्ननियुक्ती करणेस व किमान वेतनानुसार मानधन अदा करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजूकर :-** अहमदनगर महानगरपालिका आरोग्य विभाग

संदर्भ :- मा. सह. संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई क्र. राआसो / आस्था./ पुर्ननियुक्ती /१३१९२५-१३२३१०/२०१७ दिनांक २७/०३/२०१७ चे पत्र

सादर,

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा. सह. संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांनी त्यांचे कडील पत्र क्रमांक क्र. राआसो/ आस्था./ पुर्ननियुक्ती /१३१९२५-१३२३१०/२०१७ दिनांक २७/३/२०१७ अन्वये पत्र देवुन राष्ट्रीय आरोग्य अभियान योजने अंतर्गत कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात कर्मचा-यांची सदरच्या कालावधीतील पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०३/४/२०१७ पासुन कार्यमुंल्याकन अहवालानुसार पुढील सहा / अकरा महिन्याकरीता मानधनावर देणेबाबत निर्देशित केलेले आहे.

मा. शासनाच्या निर्देशानुसार अहमदनगर महानगरपालिकेमध्ये मा. महासभा ठराव क्रमांक ८ दिनांक १७/५/२००६ अन्वयेच्या ठरावानुसार आर.सी.एच. अंतर्गत योजनेनुसार कंत्राटी पध्दतीने तात्पुत्या स्वरूपात विविध पदांवर सहा / अकरा महिन्याकरीता मानधनावर अटी व शर्ती नुसार नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत तद्नंतर संबंधित कार्यरत आर.सी.एच. कर्मचा-यांना वेळोवेळी तांत्रिक खंड देवुन मानधनावर पुर्ननियुक्तीबाबत कार्यवाही करण्यत आलेली आहे.

अहमदनगर मनपा अंतर्गत अब्रेला सोसायटी यांनी आर.सी.एच.योजनेसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूकी केलेल्या व वेळोवेळी मुदतवाढ दिलेल्या बहुतांशी कर्मचा-यांनी अहमदनगर येथे मा. औद्योगिक न्यायालयात त्यांना सेवेत कायम करावे म्हणून तक्रारी दाखल केलेल्या होत्या.सदरच्या तक्रारीचा निकाल महानगरपालिकेच्या विरूध्द लागल्याने महानगरपालिकेच्या वतीने मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्र.१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५/२०१४व३५६३/२०१४,३५६४/२०१४,३५६५/२०१४,३३८४/२०१४,२१९९/२०१४,३६९०/२०१४दाखल केलेल्या होत्या.सदर याचिकांची सुनावणी होवुन मा.न्यायालयाने दिनांक२६/११/२०१५रोजी आदेश देवुन सदर याचिका निकाली काढण्यात आलेल्या असुन त्यामध्ये पदनिर्मिती, व कार्यरत कर्मचारी नियमितीकरणाचा प्रस्ताव मा. शासनास सादर करणेबाबत आदेश दिलेले आहे. प्राप्त आदेशानुसार इकडील आस्था. जा.क्र.२०३ दि.१८/४/२०१७ व २३९दि.२१/४/२०१७च्या अनुषंगाने सदर कर्मचा-यांचा पदनिर्मिती बाबतचा प्रस्ताव मा.सचिव,नगर विकास विभाग मंत्रालय,मुंबई यांना सादर करण्यात आलेला होता.त्यानुसार मा.कक्ष अधिकारी,नगर विकास विभाग नवि २५,मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रं अमपा २०१७ /प्र.क्र.५६/नवि २५,दि.८ मे २०१७अन्वये पत्र देवून त्यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने देखील तात्पुरत्या स्वरूपात/अस्थायी नियुत्या नियमित न करण्याबाबत असे स्पष्ट केले आहे की,मुळ नियुक्ती विहीत मार्गाने केलेली असल्याशिवाय सेवा नियमित करता येणार तसेच अशा कर्मचा-यांनी त्यांना नियमित सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नसल्याचे त्यांना स्पष्टपणे सांगण्यात यावे.असे निर्देश सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२५/८/२००५च्या परिपत्रकामध्ये देण्यात आले आहेत.वरील पार्श्वभुमीवर,सदर याचिकाकर्त्या कर्मचा-यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सामावुन घेणे शक्य होणार नाही.तथापि मा.उच्च न्यायालयाने दिनांक १०/०२/२०१७च्या आदेशात स्पष्ट केल्यानुसार,सदर याचिकाकर्त्या कर्मचा-यांना शासनाने निर्धारीत केलेल्या किमान वेतन दरानुसार वेतन दयावे.असे निर्देशित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिके अंतर्गत अंब्रेला सोसायटी यांनी आर.सी.एच.योजनेसाठी कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात सोबत जोडलेल्या तक्तयात नमुद केलेल्या संबंधित कर्मचा-यांना तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती नमुद करून पुर्ननियुक्त्या करण्यात आलेल्या असून संबंधितांच्या सदरच्या कालावधीतील संबंधित कर्मचारी वर्ग आर.सी.एच.विभागामध्ये कार्यरत आहेत.

दिनांक १८/१०/२०१६ रोजी मा.आयुक्त तथा अध्यक्ष अहमदनगर शहर आरोग्य सोसायटी नियामक समिती यांचे दालनात झालेल्या बैठकीमध्ये विषय क्रमांक ४ नुसार महानगरपालिकेमध्ये अर्बन आर.सी.एच.यु.एच.एम.आर.एन.टी.सी.पी.इ.कार्यक्रमांतर्गत कार्यरत असणा-या सर्व कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांना नियुक्ती/पुर्ननियुक्ती देणे बाबत कार्यवाही करण्यात यावी.असे नमुद करून निर्देशित केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमध्ये आर.सी.एच.योजनेसाठी कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या संबंधित कर्मचा-यांना तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती नमुद करून पुर्ननियुक्या करण्यात आलेल्या असून यापुर्वी त्यांचे दरमहा मानधनावरील वेतनाचा खर्चा बाबत मा.शासनाकडून अनुदान प्राप्त होत होते.तथापि सद्यस्थितीमध्ये त्यांचे दरमहा मानधनावरील खर्चा बाबत मा.शासनाकडून अनुदान प्राप्त होणार नाही.त्यामुळे त्यांचे मानधनावरील खर्च हा महानगरपलिकेच्या फंडातुन करावा लागेल.

तसेच मा.महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग ,पत्र क्रमांक अमपा २०१७/प्र.क्र.५६/नवि-२५ दिनांक ०८मे२०१७अन्वये संबंधितांना मा.उच्च न्यायालयाचे दि.१०/०२/२०१७च्या आदेशात स्पष्ट केल्यानुसार संबंधितांना मा.शासनाने निर्धारित केलेल्या किमान वेतन दरानुसार वेतन अदा करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

मा.महाराष्ट्र शासन उदयोग उर्जा व कामगार विभागाकडील दिनांक२४फेब्रुवारी२०१५च्या शासन राजपत्रातील अधिसुचनेस अनुसरून महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था या अनुसूचित रोजगारांच्या वर्गवारीतील कामगारांना देय असेलेले किमान वेतन दरा बाबत निश्चिती करण्यात आलेली आहे.त्यामध्ये कुशल कर्मचारी यांना रू.१४,०००/-अर्ध कुशल कर्मचा-यांना रूपये १३,०००/-अकुशल कर्मचा-यांना रू.११,५००/- मात्र या प्रमाणे किमान वेतन निश्चित दर्शविलेले आहे.त्याच बरोबर कामगार आयुक्त कार्यालय मुंबई यांचे दिनांक ६ऑगस्ट २०१५अन्वये किमान वेतन अधिनियम १९४८अंतर्गत अनुसुचित उदयोगातील कामगारांना विशेष भत्ता म्हणून महानगरपलिकेकरीता रू.२२४०/-प्रति महिना सर्व कामगारांकरीता निश्चित करणेत आलेला आहे.तसेच मा.सहाय्यक कामगार आयुक्त अहमदनगर यांचेकडील दिनांक१७/०५/२०१७ च्या पत्र पहाता स्त्रीरोग तज्ञ,रक्तसंक्रमण अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,वैद्यकीयअधिकारी,परिचारीका,लॅब टेक्निशियन या पदाकरीता रूग्णालय उदयोग या अनुसुचित उदयोगाचे किमान वेतन दर खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशिल | मुळ वेतन (रूपये) | | | महागाई भत्ता (रूपये) दि.०१/०१/२०१७ ते ३०/०६/२०१७ |
|---|---|---|---|---|---|
| | | परिमंडळ १ | परिमंडळ २ | परिमंडळ ३ | सर्व परिमंडळाकरीता |
| १ | कुशल | ६२००/- | ६०००/- | ५८००/- | ३५२७.५५ |
| २ | अर्धकुशल | ५७००/- | ५५००/- | ५३००/- | ३५२७.५५ |
| ३ | अकुशल | ५३००/- | ५१००/- | ४९००/- | ३५२७.५५ |

तथापि मा.केंद्र शासनाचे किमान वेतनाबाबतच्या राजपत्र पहाता कुशल,अर्धकुशल कामगारांच्या श्रेण्या व पदे दिलेली आहेत.त्यामध्ये वैदयकीय अधिकारी,नर्स,फार्मासिस्टर,क्लार्क इ.पदे नमुद नाहीत तसेच आर.सी.एच.योजनेप्रमाणे एन.यु.एच.एम.कार्यक्रमांअर्तगत पदांना केंद्र शासनाने खाली प्रमाणे पदनिहाय मानधन निश्चित केलेले आहे.

| अ.क्र. | पदांचे नाव | सद्यस्थितीमधील दरमहा मानधन |
|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | ४०,०००/- |
| २ | शहर कार्यक्रम व्यवस्थापक | २४,०००/- |
| ३ | शहर लेखा व्यवस्थापक | २१५८३/- |
| ४ | स्टाफ नर्स | १०,८०५/- |
| ५ | ए. एन. एम. | ८,६४०/- |
| ६ | लॅब टेक्नीशियन | ८,०००/- |
| ७ | फार्मासिस्ट | ८,०००/- |
| ८ | डाटा एन्ट्री ऑपरेटर काम अकौंटट | ९,६००/- |
| ९ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | ९,५८३/- |
| १० | अटेन्डंट | ६,०००/- |

अहमदनगर महानगरपालिकेमध्ये आर.सी.एच. योजनेसाठी कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या संबंधित कर्मचा-यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे कालावधीसाठी पुर्ननियुक्त्या केलेल्या असुन सदरची कालावधीतील पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०३/०४/२०१७ पासून कार्यमुल्याकन अहवालानुसार पुढील सहा / अकरा महिन्याकरीता किमान वेतन दरानुसार पुर्ननियुक्ती करणे बाबतचा विषय हा आर्थिक व धोरणात्मक स्वरूपाचा आर्थिक खर्चाशी संबंधित येत असल्याने त्याबाबतचा निर्णय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार सदर प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी तसेच मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवून मा.स्थायी समितीची पूर्व मंजुरी घेवून कार्यवाही करणे उचित होईल.

तरी उपरोक्त अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमध्ये आर.सी.एच. योजनेसाठी कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात सोबज जोडलेल्या तक्त्यामध्ये नमुद केलेल्या संबंधित कर्मचा-यांची सदरच्या कालावधीतील पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०३/०४/२०१७ पासुन कार्यमुल्यांकन अहवालानुसार पुढील सहा / अकरा महिन्याकरीता किमान वेतन दरानुसार मानधनावर पुर्ननियुक्ती करणे बाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीच्या अनुषंगाने मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवून मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरी करीता पाठविणे बाबत पुढील निर्णयास्तव आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे लिपिक आरोग्य विभाग यांचा रिपोर्ट असे.

यावर मा. वैद्यकीय आरोग्याधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार कार्यरत कर्मचा-यांना दि.३/४/२०१७ पासुन पुढे ६ महिन्याकरिता करारबध्द करणे उचित वाटते. तसेच किमान वेतन निश्चित करणेकरिता मा. स्थायी समिती पुढे ठेवणेस मान्यता असावी तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा. मुख्य लेखा परिक्षक  यांचा अभिप्राय की, मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय घेण्याच्या अधिन राहून वरील प्रमाणे "क"  प्रमाणे कार्यवाही करण्यास हरकत नाही.

यावर मा. मुख्यलेखाअधिकारी यांचा सहमती दर्शक सही

यावर मा. उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर मा. अति. आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालानुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

यावर मा. मा.आयुक्त यांचा अभिप्राय की, कृपया २०१७-२०१८ च्या वार्षिक बजेट तरतुदी तपासून सादर करावे.

यावर लिपिक आरोग्य विभाग यांचा अभिप्राय की, मा. फेरसादर, सन २०१७-२०१८ मंजूर आर्थिक अंदाजपत्रकामध्ये वेतनाचा मनपा हिस्सा (आर.सी.एच.) या लेखाशिर्ष अंतर्गत रू.८०.०० (रक्कम ऐंशी लक्ष फक्त) तरतूद करण्यात आलेली आहे. आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" नुसार वस्तुस्थिती तपासून फेरसादर करीत आहे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या आर.सी.एच. फेज-२ अंतर्गत योजनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना तांत्रिक खंड देवून पुर्ननियुक्ती करणेस व किमान वेतनानुसार मानधन अदा करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.बाबासाहेब वाकळे :- हा प्रस्ताव या आधी स्थायी समिती मध्ये आला होता का?

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- या आधी हा प्रस्ताव स्थायी समिती कडे आलेला नाही.

मा.बाबासाहेब वाकळे :- मग हा विषय आत्ताच का आला?

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- मा.शासनाचे आपल्याला दि.८/५/२०१७ रोजी पत्र आले असून त्यामध्ये शासनाने या मध्ये स्पष्ट म्हटले आहे.यांना कायम करता येणार नाही.यांना मात्र किमान वेतन देण्यात यावे.किमान वेतन ठरविण्याचे अधिकारी मा.स्थायी समितीला असून त्या करीता मा.स्थायी समिती मध्ये हा विषय आलेला आहे.यावर होणारा खर्च हा आस्थापनावरिल खर्च नसून तो आरोग्य विभागाच्या आंतर्गत घेतो.

मा.बाबासाहेब वाकळे :- किती कर्मचारी आहेत?

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- लेखाअधिकारी साहेब सांगा यांचे वेतना मध्ये किती वाढ करावी लागेल.त्यांना किमान वेतन तर करावे लागेल.ऑडिट ऑब्जेंक्शन निघनार नाही अशा पध्दतीने सांगा.

मा.सभापती साहेब :- या बाबत माहिती सांगा.

मा.बाबासाहेब वाकळे :- सध्या देत असलेले वेतन व किमान वेतन यामध्ये कीती वाढ आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- महानगरपालिका आर्थिक अडचणीमध्ये येणार नाही याची दक्षता घ्या.मुख्यलेखापरिक्षक म्हणून तुमचे काय मत आहे?

मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात :- किमान वेतन दयावे लागेल.

मा.बाळासाहेब बोराटे :- किती दयावे लागेल.

वैद्यकिय आरोग्य अधीकारी डॉ.बोरगे:- यामध्ये कर्मचा-यांच्या कॅटेगीरीज आहेत.काही डॉक्टर,नर्स आहेत.क्लेररीकल आहेत.याप्रत्येकामध्ये किमान वेतनाचा प्रकार वेगळा असेल.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- माळीवाडा दवाखाना किती दिवसांपासून बंद आहे तेथील कर्मचारी कोठे आहेत.

वैद्यकिय आरोग्य अधीकारी डॉ.बोरगे:- माळीवाडा दवाखाना बांधकाम करण्याकरीता बंद होता.तेथील कर्मचारी बाळासाहेब देशपांदे दवाखान्यामध्ये शिफ्ट करण्यात आले होते.तेथील बांधकाम पुर्ण झाले असून लवकरच दवाखाना सुरू करण्यात येईल.कर्मचा-यांचे काम फिरतीवरचे आहे.

मा.सभापती साहेब :- यांचे काम समाधान कारक आहे का?

वैद्यकिय आरोग्य अधीकारी डॉ.बोरगे:- मुख्य काम त्यांचे फिरतीवरचे असते. कोणताही कर्मचारी बसून नाही.त्यांचे काम समाधान कारक आहे.यामध्ये जे किमान वेतन आहे.डॉक्टरांचे जे किमान वेतन आहे ते कुठे दिलेले नाही.त्यांना आपण आधार दिला होता राष्ट्रीय अभियान अंतर्गत जे एम.बी.बी.एस.डॉक्टर आहेत त्यांना चाळीस हजार रूपये देतात.आपल्या कडे डॉ.कविता माने आहेत त्यांना आपण पंचविस हजार रूपये देतो.बाकीच्यांना वीस हजार पेमेंट देतो.क्लेरीकल स्टाफ साठी म्हटले आहे बारा हजार,तेरा हजार दया.नर्सेस साठी आपण बारा तेरा हजार देवू शकतो.डॉक्टरांच्या बाबत आपल्याला चर्चा करून निर्णय घ्यावयाचा आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- यामध्ये डॉक्टर आहेत का?

वैद्यकिय आरोग्य अधीकारी डॉ.बोरगे:- चार डॉक्टर आहेत.३९ नर्सेस आहेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- सर्व मिळून किती स्टाफ आहे.

वैद्यकिय आरोग्य अधीकारी डॉ.बोरगे:- २० टेक्नीकल लोक आहेत.बाकीची क्लेरीकल वगैरे ३ असे एकूण २३ लोक आहेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आस्थापना विभाग प्रमुख तुम्ही सांगा याचा महानगरपालिकेवर आर्थिक बोजा पडणार आहे का? खरात साहेब तुम्ही सांगा.विषय व्यवस्थीत झाला पाहिजे.

मुख्यलेखापरिक्षक श्री खरात :- या करीता आपण ८० लाखांची तरतुद केलेली आहे.ही एक अत्यावश्यक सेवा असल्याने त्यांना किमान वेतन देण्यात येईल

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मध्ये किती वेतन वाढविले पाहिजे ते नमुद केले नाही.किमान वेतन म्हणजे किती दयायला पाहिजे.

मुख्यलेखापरिक्षक श्री खरात :- किमान वेतना करीता परिमंडळ तयार केले आहे.परिमंडळ एक ,दोन ,तीन या मध्ये जो कामगार ज्या परिमंडळात बसेल त्यानुसार वेतन दयावे लागेल.

मा.बाळासाहेब बोराटे :- किमान वेतन लागू करावयाचे झाल्यास अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध विभाग मध्ये कार्यरत असलेल्या मानधनावरील कर्मचा-यांनाही किमान वेतन लागू करावे आगेल.महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थीतीचा विचार करता सध्याच्या मानधनामध्ये वाढकरणे बाबत निर्णय घेण्यात यावा.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- अहमदनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत अब्रेला सोसायटी यांनी आर.सी.एच.योजनेसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूका दिल्या व वेळोवेळी मुदतवाढ देखील दिलेली आहे.त्यामुळे या कर्मचा-यांची पुर्ननियुक्त्या अब्रेला सोसायटी अंतर्गत देण्यात याव्यात.

मा.श्री.दिलीप सातपुते :- वैदयकिय अधिकारी डॉ.कविता राजेश माने यांच्या मानधनामध्ये रक्कम रूपये २०००/- ने वाढ डॉ.आरती निलेश डापसे,डॉ.अश्विनी उध्दव मरकड,डॉ.शिल्पा विजयकुमार चेलवा त्याचे मानधनामध्ये रक्कम रूपये ३,०००/- वाढ.बालरोग तज्ञ डॉ.प्रविण प्रकाश डोंगरे यांच्या मानधना मध्ये रक्कम रूपये ५,०००/- वाढ तसेच कार्यक्रम व्यवस्थापक ,अकौंटन्ट,डाटा एन्टी ऑपरेटर, LHV यांना रू.२,५००/- व ANM यांना रू.२,०००/- वाढ करण्यास हरकत नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत हे आरोग्य विषयक कार्यक्रम राबविणे मधून महानगरपालिकेच्या मानधनावरील कर्मचा-यांमध्ये समावेश करणे या विषयाबाबत मा.महासभेमध्ये निर्णयास्तव पाठविण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या आर.सी.एच. फेज-२ अंतर्गत योजनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना तांत्रिक खंड देवून पुर्ननियुक्ती करणेस व किमान वेतनानुसार मानधन अदा करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट नुसार सभागृहात झालेल्या चर्चे नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत अब्रेला सोसायटी यांनी आर.सी.एच.योजनेसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूका केलेल्या आहेत व वेळोवेळी मुदतवाढ देखील दिलेली आहे.त्यामुळे या कर्मचा-यांची पुर्ननियुक्त्या अब्रेला सोसायटी अंतर्गत देण्यात याव्यात.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत हे आरोग्य विषयक कार्यक्रम राबविणे मधून महानगरपालिकेच्या मानधनावरील कर्मचा-यांमध्ये समावेश करणे या विषयाबाबत मा.महासभेमध्ये निर्णयास्तव पाठविण्यात यावा.

वैदयकिय अधिकारी डॉ.कविता राजेश माने यांच्या मानधनामध्ये रक्कम रूपये २०००/- ने वाढ डॉ.आरती निलेश डापसे,डॉ.अश्विनी उध्दव मरकड,डॉ.शिल्पा विजयकुमार चेलवा त्याचे मानधनामध्ये रक्कम रूपये ३,०००/- वाढ.बालरोग तज्ञ डॉ.प्रविण प्रकाश डोंगरे यांच्या मानधना मध्ये रक्कम रूपये ५,०००/- वाढ तसेच कार्यक्रम व्यवस्थापक,अकौंटन्ट,डाटा एन्टी ऑपरेटर, LHV यांना रू.२,५००/- व ANM यांना रू.२,०००/- वाढ करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या आर.सी.एच. फेज-२ अंतर्गत योजनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना तांत्रिक खंड देवून पुर्ननियुक्ती करणेस व किमान वेतनानुसार मानधन अदा करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट नुसार सभागृहात झालेल्या चर्चे नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत अब्रेला सोसायटी यांनी आर.सी.एच.योजनेसाठी तात्पुरत्या स्वरूपात नेमणूका केलेल्या आहेत व वेळोवेळी मुदतवाढ देखील दिलेली आहे.त्यामुळे या कर्मचा-यांची पुर्ननियुक्त्या अब्रेला सोसायटी अंतर्गत देण्यात याव्यात.

वैदयकिय अधिकारी डॉ.कविता राजेश माने यांच्या मानधनामध्ये रक्कम रूपये २०००/- ने वाढ डॉ.आरती निलेश डापसे,डॉ.अश्विनी उध्दव मरकड,डॉ.शिल्पा विजयकुमार चेलवा त्याचे मानधनामध्ये रक्कम रूपये ३,०००/- वाढ.बालरोग तज्ञ डॉ.प्रविण प्रकाश डोंगरे यांच्या मानधना मध्ये रक्कम रूपये ५,०००/- वाढ तसेच कार्यक्रम व्यवस्थापक,अकौंटन्ट,डाटा एन्टी ऑपरेटर, LHV यांना रू.२,५००/- व ANM यांना रू.२,०००/- वाढ करण्यास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत हे आरोग्य विषयक कार्यक्रम राबविणे मधून महानगरपालिकेच्या मानधनावरील कर्मचा-यांमध्ये समावेश करणे या विषयाबाबत मा.महासभेमध्ये निर्णयास्तव पाठविण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ३२ सोमवार दि.२८/०८/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक १, २, ३ व ४ करिता मधील कचरा संकलन व वाहतुक करणे करीता मंजुर वार्षिक सन २०१७-२०१८ च्या मंजुर दरानुसार मजुर उपलब्ध करून घेणे मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग

संदर्भ :- १. मा. अति. आयुक्त यांच्या दि.१७/०७/२०१७ रोजीच्या दर मंजुरीनुसार

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रस्ताव देण्यात येतो की, घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील सन २०१६-२०१७ च्या वार्षिक दर मंजुरीने अहमदनगर महानगरपालिका, प्रभाग समिती क्र. १,२,३, व ४ करिता कचरा संकलन व वाहतुक करणेकामी कार्यारंभ आदेश घनकचरा व्यवस्थापन विभाग जा.क्र. ११९ दिनांक २३/०६/२०१७ रोजी अन्वये दिनांक २४/०६/२०१७ पासून एक महिन्याकरीता खालील प्रमाणे शिवकृपा सर्विसेस, अहमदनगर यांच्या कडून कंत्राटी मजुर उपलब्ध करून घेण्यात आलेले आहे.

| अ.नं. | स्वच्छता निरीक्षक | प्रभाग समिती कार्या. | आवश्यक खाजगी मजुर संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजकुमार सारसर | प्रभाग समिती क्र. १ | ५ |
| २ | श्री. पी.एस. बिडकर | प्रभाग समिती क्र. १ | ५ |
| ३ | श्री.पी.व्ही. रामदीन | प्रभाग समिती क्र. ३ | ४ |
| ४ | श्री.बी.एच.भोर | प्रभाग समिती क्र. ३ | ११ |
| ५ | श्री. शेख अन्वर | प्रभाग समिती क्र. ४ | ४ |
| ६ | श्री. आ.सी. रामदीन | प्रभाग समिती क्र. ४ | ४ |
| | | एकुण | ३३ |

मात्र सदरची मुदत दिनांक २३/०७/२०१७ रोजी संपुष्ठात येत असुन सध्या सन २०१७-२०१८ करीता नवीन कंत्राटी मजुरांचे दर रक्कम रू.४०६/- प्रति कंत्राटी मजुर प्रति दिन रक्कम मंजुर झाली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे कंत्राटी मजुरांची आवश्यक आहे.

| अ.नं. | स्वच्छता निरीक्षक | प्रभाग समिती कार्या. | आवश्यक खाजगी मजुर संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजकुमार सारसर | प्रभाग समिती क्र. १ | ५ |
| २ | श्री. पी.एस. बिडकर | प्रभाग समिती क्र. १ | ५ |
| ३ | श्री.पी.व्ही. रामदीन | प्रभाग समिती क्र. ३ | ४ |
| ४ | श्री.बी.एच.भोर | प्रभाग समिती क्र. ३ | ११ |
| ५ | श्री. शेख अन्वर | प्रभाग समिती क्र. ४ | ४ |
| ६ | श्री. आ.सी. रामदीन | प्रभाग समिती क्र. ४ | ४ |
| | | एकुण | ३३ |

वरील प्रमाणे प्रभाग समिती कार्यालयास दिनांक २४/०७/२०१७ पासुन (१८० दिवस) सहा महिना किंवा संपुर्ण शहराकरीता खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक करणेकामाची निविदा प्रक्रिया होईपर्यत आदर्श सर्विसेस , नाशिक यांना मुदत देणे उचित वाटते.

सब घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील सन २०१७-२०१८ च्या मंजुर दराप्रमाणे सदर आदर्श सर्विसेस, नाशिक संस्थे सोबत नियमानुसार स्टॅम्प पेपरवर करारनामा करून प्रभाग समिती कार्या. क्र.१,२,३ व ४ करीता प्रतिदिन रक्कम रूपये ४०६/- या दराने दैनंदिन एकुण ३३ कंत्राटी मजुर १८० दिवसाकरीता अंदाजे एकुण खर्च रक्कम रू.२४,११,६४०/- एवढा खर्च अपेक्षित आहे. त्याकामी येणा-या खर्चास मंजुरीस्तव सविनय सादर. /**अ**

खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक करणे. पान नं. ०६/१५ वर नोंद असे.

१. तरतुद :- ८,००,००,०००/- सन २०१७-२०१८

२. पुर्वीचा खर्च :- १,०८,५८,४८०/-

३. प्रस्तावीत खर्च :- २४,११,६४०/-

२ व ३ ची बेरीज :- १,३२,७०,१२०/-

४. शिल्लक रू. :- ६,६७,२९,८८०/-

येणेप्रमाणे आरोग्याधिकारी यांचा रिपोर्ट असे.

यावर मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, आरोग्य अधिकारी घनकचरा विभाग यांचा प्रस्तावानुसार "अ" प्रमाणे कार्यवाहीस्तव दि. १ जुलै २०१७ पासुन GST लागु झाल्याने वजाती बाबत खात्री करावी महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम ७३ (ड) प्रमाणे कार्यवाही करावी वरील "अ" मान्य करता येईल.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.अति. आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालामधील "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे उचित होईल.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- प्रभाग समिती क्रमांक १, २, ३ व ४ करिता मधील कचरा संकलन व वाहतुक करणे करीता मंजुर वार्षिक सन २०१७-२०१८ च्या मंजुर दरानुसार मजुर उपलब्ध करून घेणे मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट बाबत माहिती सांगा.

घनकचरा विभाग प्रमुख श्री.पैठणकर :- सध्या एक महिन्याच्या मुदतीवर आपण ३५ मजूर उपलब्ध करून घेतले आहेत.त्याची मुदत दि.५ सप्टेंबर २०१७ रोजी संपणार आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- किती निविदा आल्या होत्या.

घनकचरा विभाग प्रमुख श्री.पैठणकर :- निविदा ऑनलाईन प्रसिध्द केल्या होत्या साधारण चार निविदा धारकांनी निविदा भरल्या होत्या त्यामध्ये तीन पात्र होते.त्यामुळे तीन जनांचे बीड ओपन करण्यात आले.त्यामध्ये जो एल वन त्याचे दर ग्राहय धरण्यात आले आहे.

मा.सभापती साहेब :- एक्झीम पेस्ट यांचे दि.२९/७/२०१७ रोजी पत्र व अनिल शिंदे,सभागृह नेता यांचे दि.२८/७/२०१७ रोजीचे पत्र प्राप्त झाले असुन त्या पत्राच्या प्रती सर्व सदस्यांना अवलोकनार्थ देण्यात आल्या आहेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मे एझमीम पेस्ट कंन्ट्रोल यांनी ई निविदा क्रमांक १५११ मध्ये भाग घेतला होता.कागदपत्रांच्याछाननी मध्ये त्रुटींची् पुर्तता करणे बाबत घनकचरा व्यवस्थापन विभाग जा.क्र.९९ दि.९/६/२०१७ रोजी मे एझमीम पेस्ट कंन्ट्रोल व आदर्श सर्व्हिसेस नाशिक यांना पत्र दिले आहे.त्यानुसार मे एझमीम पेस्ट कंन्ट्रोल यांनी दि.१२/६/२०१७ रोजी सर्व्हिस टॅक्स व भविष्य निर्वाह निधी याबाबतचा खुलासा देण्यात आलेला आहे.त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक होते.

घनकचरा विभाग प्रमुख श्री.पैठणकर :-छाननीच्या वेळी त्यांचे पत्र आलेले आहे.त्यामध्ये त्यांनी सर्व्हिस टॅक्स भरण्याची सुट देण्यात आलेली आहे.परंतु भविष्य निर्वाह निधी प्रिन्सीपल इप्लयरची म्हणजे महानगरपालिकेची राहील.असे त्यांनी अर्जामध्ये नमुद केले होते.त्यामुळे एक्झीम पेस्ट हा एल २ मध्ये गेला होता.आदर्श सर्व्हिसेस हे एल वन असल्याने त्यांचा प्रस्ताव तयार करून स्थायी समिती पुढे मंजूरी करीता सादर करण्यात आला आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- आज स्थायी समिती कडे एक्झीम पेस्टकंन्ट्रल यांनी दिलेले पत्र सभेमध्ये वाचण्यात यावे.

त्यानुसार पत्राचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब,स्थायी समिती,अहमदनगर महानगरपालिका.अ.नगर

विषय :- ई निविदा क्र.१५११ मधील कचरा संकलन करीता मजुर पुरविणे बाबत..

महोदय,

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की,आमच्या संस्थेने (Exim pest Control)ई निविदा क्र.१५११ मधील कचरा संकलन करीता मजुर पुरविणे या कामा करीत भाग घेतला होता.आमच्या संस्थेचे दर हे इतर संस्थांपेक्षा कमी असून रू.४००/- प्रति मजूर प्रति दिवस असा आहे.

तरी या आधिच्या पत्रामध्ये आम्ही सर्व्हिस टॅक्स व भविष्य निर्वह निधी हा भरण्याची जबाबदारी ही आमच्या संस्थेची राहिल असा खुलासा केलेला आहे.आधीच्या पत्रामध्ये कोणास काही गैरसमज झालाअसल्यास तो दुरूस्त करून आमच्या संस्थेचा दर हा प्रति मजुर प्रति दिवस ४००/- (सर्व टॅक्स समाविष्ट करून) ग्राहय धरण्यात यावा ही विनंती.

मा.श्री. दिलीप सातपुते :- मागील ५ वर्षापासून एकाच ठेकेदारास पाठिशी घालून मुदत वाढ किंवा निविदा प्रक्रिये मध्ये अटी व शर्ती मध्ये ठेकेदाराच्या सांगण्यावरून फेरफार करून याच संस्थेला कसे काम देण्यात येत आहे.यामध्ये अधिका-यांचे लागेबांधे दिसून येत आहे.१ जुलै पासून GST प्रणाली सुरू झाल्यानंतर सर्व्हिस टॅक्स व इतर टॅक्स संपुष्टात आला आहे.प्रशासन स्थायी समितीची दिशाभुल करून जादा दराच्या निविदेस मंजूरी घेण्याचा घाट घालत आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- निगोसिएशन स्थायी समिती मध्येच झाले पाहिजे. मुदतवाढ किती दिवस दिवसांपासून चालले आहे.जर मे एझमीम पेस्ट कंन्ट्रोल संस्था ४००/-रू प्रति दिन प्रति दिवस या दराने काम करण्यास तयार आदर्श सर्व्हिसेस तर ४०६ /- प्रति मजूर प्रति दिवस दराची निविदा कशाच्या आधारावर मंजूर करावयाची असे विषय स्थायी समितीकडे पाठवता कशाला? ज्यामध्ये महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे.स्थायी समितीला तसा अधिकार आहे.तुम्हाला अधिकार दिले म्हणजे तुम्ही खालच्या खालीच ठरवायचे का?

मा.सभापती साहेब :- मा.सभागृह नेते श्री.अनिल शिंदे यांनी दि.२८/७/२०१७ रोजी पत्र देवून अहमदनगर महानगरपालिकेच्या कचरा संकलन व नाले सफाई करीता मजुर पुरविणे या कामाच्या निविदेमध्ये मोठयाप्रमाणात घोटाळा झाल्याचे दिसून येते अशा अशयाचे पत्र दिलेले आहे.तसेच मे. एझमीम पेस्ट कंन्ट्रोल यांनी ४००/-रू प्रति दिन प्रति दिवस दराने काम करण्यास तयार असल्या बाबत पत्र दिले असल्यावर यावर सभेमध्ये निर्णय घेण्यात यावा.

मा.बाळासाहेब बोराटे :- GST मुळे अनेक कामे बंद पडली होती.आत सर्व क्लीअर झाले आहे.आपला मुद्दा कोठे आहे.रू.४००/- आणि रू.४०६/- महानगरपालिकेच्या आर्थिक हिताला बाधा न येणार नाही.त्याला काम देण्यात यावे.

मा.आयुक्त साहेब :- पत्र आत्ताच मा.सभापती व समिती सदस्यांकडे आलेले आहे.याआधी आलेले नव्हते खाते प्रमुखांना सुचना करीत होतो.हे पत्र सभेच्या पटलावर ठेवा आणी त्याच्या नंतर हे पत्र विचारात घेवून व आधिचे एल वन वगैरे विचारात घेवून या पत्रा मध्ये त्यांनी असे म्हटले आहेकी,रू.४००/-जो दर आहे सर्व टॅक्स समाविष्ट करून दर असल्याने मुख्यलेखाअधिकारी व मुख्यलेखापरिक्षक यांनी पत्र विचारात घेवून निर्णय घेण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- या पत्रावर कोणत्या सभेमध्ये निर्णय घ्यायचा,आजच्या सभेत किंवा पुढील सभेत?

मा.आयुक्त साहेब :- याच सभेमध्ये निर्णय घ्या.

मा.श्री.दत्तात्रय कावरे :- महानगरपालिकेच्या आर्थीक हिताचा विचार करता एक्झीम पेस्ट कंन्ट्रोल या संस्थेचे निविदा दर कमी आहे.तरी याबाबतचा निर्णय प्रशासन घेईल.

मा.श्री.मनोज दुलम :- एक्झीम पेस्ट कंन्ट्रोल या संस्थेचे दर कमी असल्याने महानगरपालिकेच्या आर्थिक फायदा पाहून या बाबतचा निर्णय प्रशासनाने घ्यावा.

मा.सभापती साहेब :- सभेतील चर्चेनुसार व मा.सभागृह नेते श्री.अनिल शिंदे यांनी दि.२८/७/२०१७ रोजी पत्र व एक्झीम पेस्ट कंन्ट्रोल यांनी दरा बाबत दिलेले पत्र याअनुषंगाने मे.आदर्श सर्व्हिसेस, नाशिक यांचा दर जास्त असल्याचे निदर्शनास येते. महानगरपालिकेचा आर्थिक हिताचा विचार करता एक्झीम पेस्ट कंन्ट्रोल या संस्थेचे दर कमी असल्याचे अवलोकनामध्ये निदर्शनास येत असल्याने या बाबत चा निर्णय प्रशासनाने घ्यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील प्रभाग समिती कार्या. क्र.१,२,३ व ४ करीता कचरा संकलन व वाहतुक तसेच नालेसफाई करणे कामी खाजगी ठेकेदारामार्फत पुरवठा करणे.एकुण ३३ कंत्राटी मजुर १८० दिवसाकरीता या कामा साठी सभेमध्ये प्राप्त अर्ज व त्यावर झालेल्या चर्चे नुसार.मे.एक्झीम पेस्ट कंन्ट्रोल यांचा दर प्रति मजुर प्रति दिवस ४००/- सर्व टॅक्स समाविष्ट करून असा आहे व मे.आदर्श सर्व्हिसेस, नाशिक यांचा दर रू.४०६ आहे महानगरपालिकेचा आर्थिक हिताचा विचार करता एक्झीम पेस्ट कंन्ट्रोल या संस्थेचे दर कमी असल्याचे अवलोकनामध्ये निदर्शनास येत असल्याने या बाबत चा निर्णय प्रशासनाने घ्यावा.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.दत्तात्रय कावरे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मनोज दुलम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ३३ सोमवार दि.२८/०८/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहर बससेवा उपक्रम अभिकर्ता संस्था मे. यशवंत ऑटो प्रा.लि. यांचे असमाधानकारक सेवेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजूकर :-** अहमदनगर महानगरपालिका मोटार व्हेईकल विभाग

संदर्भ :- १. इकडील नोटीस दि.०९/०६/२०१७

२. यशवंत ऑटो प्रा.लि. यांचे खुलासा पत्र दि.२३/०६/२०१७

३. मा.श्री. अनिल शिंदे , सभागृह नेते यांचे पत्र दि.०७/०७/२०१७

४. दि.१२/७/२०१७ रोजी मेकॅ. इंजि. महानगरपालिका यांची शहर शहर बसेस डेपोला झालेली व्हीजीट

मा. सादर,

अहमदनगर महानगरपालिकेने शहर बससेवा अभिकर्ता संस्था मे. यशवंत ऑटो प्रा.लि. यांचेकडून बससेवे बाबतच्या कराराचा भंग होत असल्याने मा. महापौर दालनामध्ये दि.२४/५/२०१७ रोजी मिटींग होवून मा. महापौर व इतर पदाधिकारी यांचे सूचनेनुसार बससेवेच्या अवस्थेबाबत दि.२५/५/२०१७ रोजी मा.उपायुक्त व मा. मेकॅनिकल इंजिनिअर यांनी बसडेपो येथे प्रत्यक्ष व्हीजीट देवून पाहणी केली असता बसेस अत्यंत दुरावस्थेत आढळून आलेल्या होत्या. तसेच अभिकर्ता संस्थेकडून कराराचा भंग होत असल्याने महानगरपालिकेच्या दिनांक ९/६/२०१७ रोजी बससेवेचा ठेका रद्द का करण्यांत येवू नये ? याबाबत अभिकर्ता संस्थे नोटीस देण्यात आलेली आहे.

त्यानुसार अभिकर्ता संस्था त्यांचे कडील पत्र जा.क्र. ८० दि.२३/६/२०१७ अन्वये नोटीशीबाबत खुलासा सादर केलेला आहे. त्यानुसार दिनांक १३/८/२०१५ ते मार्च २०१७ पर्यत १५ ते २१ बसेसद्वारे सेवा पुरविली जात होती. परंतु एप्रिल व मे २०१७ मध्ये बसेस संख्या कमी करण्यात आली होती. याबाबत शाळा / कॉलेज यांना उन्हाळी सुटटी असल्याने प्रवासी संख्येत घट झाल्याने, बसेस दुरूस्ती /देखभाल व आर.टी. ओ. पासींग करणेसाठी संख्या कमी केली आहे. बसेसची वेळ जून २०१७ पासून नियमीत सकाळी ५.०० ते रात्री ११.०० अशी वेळापत्रकानुसार करण्यात आली आहे.

बसेसवरील चालक व वाहक यांना ओळखपत्र, गणवेश देण्यात आलेले आहेत . महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या मार्गावर तसेच महानगरपालिकेने कळविल्यानंतरच आर.टी.ओ. परवानगी घेवून नवीन मार्गावर बस चालविली जाते. बालपोषण कर प्रवासी कर २ महिन्याचा थकीत आहे. बसेसच्या खिडकी, काचा सीट दुरूस्ती काम चालू असून काही बसेसची कामे झालेली आहेत. नोटा बंदी, अनाधिकृत ऑटो, थकीत अनुदान वाहनतळ उपलब्ध नसल्याने बससेवा अडचणीत असलेबाबत खुलासा प्राप्त झालेला आहे.

मा. सभागृह नेते श्री. अनिल शिंदे यांनी त्यांचेकडील जा.क्र.२७ दिनांक ७/७/२०१७ रोजी स्मरणपत्र देवून दिनांक ९/५/२०१७ रोजी बससेवा अभिकर्ता संस्था यांची बैठक घेवून , समज देण्यात येवूनही बससेवेत सुधारणा झालेली नसून प्रशासन याबाबत वेळ काढूपणा करीत असल्याने संस्थेचा ठेका रद्द करण्यात येवून बससेवेबाबत नव्याने निविदा काढणेबाबत संदर्भिय पत्र प्राप्त झाले आहे.

उपरोक्त दि.२४/५/२०१७ ची मिटींग , दि.१२/७/२०१७ बससेवा व्हिजीट, सभागृह नेते यांचे पत्र, महानगरपालिका नोटीस दि.९/०६/२०१७ अभिकर्ता यांचा खुलासा यांचे अनुषंगाने दि.१२/७/२०१७ रोजी मेकॅनिकल इंजिनिअर यांनी बससेवेच्या डेपोत व्हीजीट दिलेली आहे. त्यानुसार प्रत्यक्षात खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१] १६ बसेस चालू स्थितीत असून मार्गावर कार्यरत असल्याचे समजले, ४ बसेस बंद असल्याचे लक्षात आले.

२] ब-याचशा बसेसना काचा बसविलेल्या आढळून आल्या आहेत.

३] बसेस अस्वच्छ होत्या.४] बसेसच्या वाहनचालक / कंडक्टर यांचेकडे गणवेश / ओळखपत्र आढळून आले नाही५] बसेसच्या मार्गाबाबत व्यवस्थापक श्री. घिगे यांचेशी चर्चा केली असता, त्यांचेकडून समाधानकारक उत्तरे प्राप्त झाली नाहीत.६] मा. शासनाकडील बालकुपोषण व प्रवासी कर थकीत आहे.७] वाहनतळाबाबत त्यांचे सोयीनुसारच्या जागेबाबत प्रस्ताव दाखल करणेस सांगण्यात आले आहे. तसेच याबाबत नगररचना विभागाशी संपर्क साधणेस सांगितले आहे.

बससेवेच्या दुरावस्थेबाबत व असमाधानकारक सेवे अनुषंगीक मा.सभागृह नेते श्री. अनिल शिंदे यांनी दि.७/७/२०१७ रोजी पत्र दिलेले आहे.

करिता

१] अभिकर्ता संस्थेकडून देण्यात येणा-या असमाधानकारक सेवे बाबत मा. महापौर, मा. पदाधिकारी तसेच मा. सभागृह नेते श्री. अनिल शिंदे यांचे पत्राचे अनुषंगाने उचित कार्यवाही होणे बाबत प्रस्ताव मा. स्थायी समितीकडे सादर करणे योग्य

२] शहर बससेवा चालवितांना देण्यात येणारी नुकसान भरपाई रक्कम अभिकर्त्यांची सेवा असमाधानकारक असल्याने मोटार व्हेईकल विभागाकडून माहे नोव्हेंबर २०१६ पासून प्रस्तावीत केलेली नाही. याबाबत ही मा. स्थायी समिती कडून योग्य ते निर्णय मिळणे योग्य मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा रिपोर्ट असे,

यावर मेकॅ.इंजि. यांचा अभिप्राय की, अहवालात नमूद परिस्थितीबाबत योग्य तो निर्णय होणेकामी प्रस्ताव मा.स्थायी समिती कडे सादर करणे योग्य मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर. /अ

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा सहमती दर्शक सही

यावर अति. आयुक्त यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालानुसार मान्यतेस्तव सादर

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, कृपया मु.ले.प.मार्फत सादर करावे.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.आयुक्त यांचे अभिप्रायानुसार नमूद परिस्थितीबाबत योग्य ते निर्णय होणेकामी प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणे उचित वाटते. मॅके.इंजि. दि.१२/७/२०१७ रोजी भेट दिल्यानंतर ज्या काही उणिवा दिसून आल्या आहे ज्या बाबत संबंधित ठेकेदारास पत्र दिले आहे यांचा टिप्पणीत उल्लेख नाही.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, तरी विभागाने प्रस्तावीत केल्या प्रमाणे मा. स्थायी समितीस पुढील निर्णयास्तव सादर करण्यास हरकत नसावी. /अ

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--****--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- शहर बससेवा उपक्रम अभिकर्ता संस्था मे. यशवंत ऑटो प्रा.लि. यांचे असमाधानकारक सेवेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- सविस्तर माहिती संबंधीत विभाग प्रमुखांनी दयावी.

मेकॅनिकल इंजी. श्री.निकम :- शहर बस सेवे बाबत तक्रारी आल्या होत्या.त्या संदर्भात चर्चा होवून ज्या त्रुटी आढळून आल्या होत्या त्या बाबत नोटीस दिली होती.

मा.सभापती साहेब :- काय नोटिस दिली होती ती वाचून दाखवा.

मेकॅनिकल इंजी. श्री.निकम :- अहमदनगर महानगरपालिकेने शहर बससेवा अभिकर्ता संस्था मे. यशवंत ऑटो प्रा.लि. यांना दिलेली नोटिस सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आली.

मा.श्री.दिलीप सातपुते :- अभिकर्ता संस्था यांची कामाची मुदत किती दिवस बाकी आहे.

मेकॅनिकल इंजी. श्री.निकम :- अभिकर्ता संस्थेबरोबर जानेवारी १५ मध्ये करारनामा झाला होता.त्यावेळी कामाची मुदत १० वर्षापर्यत राहीत असे होते.

मा.श्री.दिलीप सातपुते :- मा.आयुक्त साहेब वर्षा पासून ठेकेदारास नुकसान भरपाईची रक्कम दिलेली नाही.एखादया संस्थेचे साठ लाख रूपये थकल्यास तो आपल्याला काय सेवा देणार आहे.नुकसान भरपाईची रक्कम आपण का अदा केली नाही?

मुख्यलेखाअधिकारी श्री झिरपे: - आपल्याकडे जसे पैसे उपलब्ध होतात त्यानुसार देणीदारांची देणी देतो.

मा.श्री.दिलीप सातपुते :- नुकसान भरपाईची रक्कम त्यांना त्वरीत काही रक्कमेचा चेक देण्यात यावा.

मेकॅनिकल इंजी. श्री.निकम :- ठेकेदाराचे पेमेंट वेळेवर अदा केले जात नाही.मा.महापौर साहेब व सभागृह नेते यांनी या बाबत मा.आयुक्त यांना पत्र दिले आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- एक वर्षापासुन सदर संस्थेस पेमेंट अदा केलेले नाही.इतक्या दिवसापासून आपल्याकडून पेमेंट होत नसेल तर ठेकेदार सुध्दा बस चालविणार आहे.

मा.आयुक्त साहेब :- किती पेमेंट थकीत आहे.

मेकॅनिकल इंजी. श्री.निकम :- सधारण: ६० लाख रूपये थकीत आहे.

मा.सभापती साहेब :- सध्या किती बसेस चालू आहे.

मेकॅनिकल इंजी. श्री.निकम :- सध्या १६ बसेस चालू आहेत.

मा.श्री.दिलीप सातपुते :- या आधी प्रसन्ना पर्पल या अभिकर्त्याकडे बस सेवेचा ठेका होता.या संस्थेचे सुध्दा पैसे दिले गेले नसल्याने त्याने सेवा देण्याचे थांबविले.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे :- पैसे नसल्यामुळे बिल पेंडिंग आहे.जेवढे पैसे देणे शक्य होईल तेवढे दिलेले आहे.दोन महिन्याला आपण त्यांना पैसे देतो.पैसे उपलब्ध झाले तर देण्यात येईल.

मा.आयुक्त साहेब :- आर्थीक परिस्थितीचा अंदाज घेवून या बाबत निर्णय घेण्यात येईल.

मा.बाळासाहेब बोराटे :- बसेसची आवस्था सुध्दा खुप खराब झालेली आहे.गाडीची कंडीशन चांगली पाहीजे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- सध्या चालू असलेल्या ठेकेदारची सर्व्हिस चांगली नसल्यास या संस्थेचे काम चालू ठेवून नविन टेंडर काढा.प्रवाशांची गैरसोय करू नका.

मा.आयुक्त साहेब :- ठेका रद्द करणे बाबतचा निर्णय सभेने घ्यायचा आहे.

मेकॅनिकल इंजी. श्री.निकम :- सध्याची सेवा असमाधानकारक आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- त्यांना ताकीत दया.तुम्ही स्वत: पहाणी करा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- सध्याच्या बसेस ब-याच खराब झाल्या आहेत.पर्यायी व्यवस्था ठेवून टेंडर काढा.

मा.आयुक्त साहेब :- मला असे वाटते की,त्यांना १ महिन्याची मुदत सेवा सुधारण्या करीता दयावी व करारनामा पाहून महानगरपालिकेकडून अटी व शर्ती चा भंग होणार नाही याबाबतची दक्षता घेवून सदर संस्थेला सेवा बंद करणे बाबतची नोटीस मनपा विधीज्ञ यांचा अभिप्राय घेवून देण्यात यावी.आपल्याला जेवढे शक्य आहे पेमेंट अदा करावे.

मा.श्री.संजय शेंडगे :- मा.आयुक्त साहेब, दरम्यानच्या काळामध्ये निविदा प्रक्रीया राबवून नविन बससेवा वाहतुक ठेकेदार संस्था मार्फत सेवा पुरविणे बाबत ची कार्यवाही करावी.तुम्ही दुसरे टेंडर काढण्याची प्रक्रिया चालू करा.अशाही त्यांच्या बद्दल तक्रारी आपल्याकडे आलेल्या आहेत.

मा.बाळासाहेब बोराटे :- अभिकर्ता संस्था मे. यशवंत ऑटो प्रा.लि.यांना एक महिन्याची मुदत सेवा सुधारण्या करीता देण्यात येत आहे. सदर संस्थेला सेवा बंद करणे बाबतची नोटीस मनपा विधीज्ञ यांचा अभिप्राय घेवून देण्यात यावी. तसेच विभागाने करारनामा पाहून महानगरपालिकेकडून अटी व शर्ती चा भंग होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी.दरम्यानच्या काळामध्ये अहमदनगर शहर बससेवा उपक्रम राबवीणे करीता निविदा प्रसिध्द करण्यस मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहर बससेवा उपक्रम अभिकर्ता संस्था मे. यशवंत ऑटो प्रा.लि. यांचे असमाधानकारक सेवेबाबतचा ऑफिस रिपोर्ट नुसार सभागृहात झालेल्या चर्चे नुसार बससेवा अभिकर्ता संस्था मे. यशवंत ऑटो प्रा.लि.यांना शहर बससेवा चालवितांना देण्यात येणारी नुकसान भरपाई रक्कम अदा करण्यात यावी तसेच एक महिन्याची मुदत सेवा सुधारण्या करीता देण्यात येत आहे. सदर संस्थेला सेवा बंद करणे बाबतची नोटीस मनपा विधीज्ञ यांचा अभिप्राय घेवून देण्यात यावी. तसेच विभागाने करारनामा पाहून महानगरपालिकेकडून अटी व शर्ती चा भंग होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी.दरम्यानच्या काळामध्ये अहमदनगर शहर बससेवा उपक्रम राबवीणे करीता निविदा प्रसिध्द करण्यस ही सभा मान्यता देत आहे.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर शहर बससेवा उपक्रम अभिकर्ता संस्था मे. यशवंत ऑटो प्रा.लि. यांचे असमाधानकारक सेवेबाबतचा ऑफिस रिपोर्ट नुसार बससेवा अभिकर्ता संस्था मे. यशवंत ऑटो प्रा.लि. यांचेकडून बससेवे बाबतच्या कराराचा भंग होत असल्याने मा. महापौर व इतर पदाधिकारी यांचे सूचनेनुसार बससेवेच्या अवस्थेबाबत दि.२५/५/२०१७ रोजी मा.उपायुक्त व मा. मेकॅनिकल इंजिनिअर यांनी बसडेपो येथे प्रत्यक्ष व्हीजीट देवून पाहणी केली असता बसेस अत्यंत दुरावस्थेत आढळून आलेल्या होत्या. तसेच अभिकर्ता संस्थेकडून कराराचा भंग होत असल्याने महानगरपालिकेच्या दिनांक ९/६/२०१७ रोजी बससेवेचा ठेका रद्द का करण्यांत येवू नये ? व शहर बससेवा चालवितांना देण्यात येणारी नुकसान भरपाई रक्कम अभिकर्त्यांची सेवा असमाधानकारक असल्याने मोटार व्हेईकल विभागाकडून माहे नोव्हेंबर २०१६ पासून प्रस्तावीत केलेली नाही.याबाबत अभिकर्ता संस्थेस दिलेल्या नोटीस बाबत सभागृहात झालेल्या चर्चे नुसार बससेवा अभिकर्ता संस्था मे. यशवंत ऑटो प्रा.लि.यांना शहर बससेवा चालवितांना देण्यात येणारी नुकसान भरपाई रक्कम अदा करण्यात यावी तसेच एक महिन्याची मुदत सेवा सुधारण्या करीता देण्यात येत आहे. सदर संस्थेला सेवा बंद करणे बाबतची नोटीस मनपा विधीज्ञ यांचा अभिप्राय घेवून देण्यात यावी. तसेच विभागाने करारनामा पाहून महानगरपालिकेकडून अटी व शर्ती चा भंग होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी.दरम्यानच्या काळामध्ये अहमदनगर शहर बससेवा उपक्रम नव्याने राबवीणे करीता निविदा प्रसिध्द करण्यास ही सभा मान्यता देत आहे.खर्च मंजूर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.संजय शेंडगे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ३४ सोमवार दि.२८/०८/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपलिका विद्युत विभागाकरिता मोटार व्हेईकल विभागामार्फत ई निविदा राबवून २ नग हायड्रोलिक गाडी खरेदी करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजूकर :-** अहमदनगर महानगरपलिका इलेक्ट्रीक विभाग

सदंर्भ :- १. इलेक्ट्रीकल विभाग जा.क्र.३५८ दि.२६/८/२०१६

२. मोटार व्हेईकल विभाग जा.क्र.३८२ दि.३०/६/२०१७

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये विषयांकित दोन हायड्रोलिक गाडी मोटार व्हेईकल विभागामार्फत ई - निविदा राबवून २ नग हायड्रोलिकल गाडी खरेदी खर्च रक्कम रू.२८,३६,०००/- खर्चास मा. स्थायी समिती सभा क्र. ०६ ठराव क्र.८२ दिनांक ०३/०९/२०१६ ठरावान्वये मान्यता प्राप्त झालेनुसार सदर प्रस्ताव वाहने खरेदी करिता मोटार व्हेईकल विभागास पाठविण्यात आलेनुसार त्यांचे मार्फत ई - निविदा प्रक्रिया राबवून पुढील प्रमाणे पत्रात नमुद केले आहे.

मोटार व्हेईकल विभाग जा.क्र.३ ३८२ दि.३०/०६/२०१७ अन्वये २ नग हायड्रोलिक गाडी खरेदी कामी रक्कम रू.३२,४५,०००/- इतका खर्च अपेक्षित दर्शविलेला आहे. तरी मा. स्थायी समितीमध्ये मंजूर रक्कम रूपये २८,३६,०००/- आहे व ई - निविदा रक्कम रू.३२,४५,०००/- आहे. तरी वाढीव रक्कम रू.४,०९,०००/- या खर्चास मान्यतेस्तव व मोटार व्हेईकल विभाग जा.क्र. ३८२ दि.३०/०६/२०१७ अन्वये कळविले आहे.

मा. महासभा सभा क्र.०८ प्रस्ताव क्र.४१ दि.२७/३/२०१७ अन्वये अ.क्र. ४३ अन्वये ३५ लाख खर्चास मान्यता घेणेबाबत सोबत ठराव सादर करण्यात आलेले आहे.

तरी सदर निविदेप्रमाणे रू.३२,४५,०००/- रक्कम व सदर खर्च घसारा निधीमधून खर्च करणेस तसेच पुढील कार्यवाही मोटार व्हेईकल विभागामार्फत करणेस रिपोर्ट मा.स्थायी समिती कडे सादर करणेस मान्यतेस तथा आदेशार्थ सादर. /**अ**

येणेप्रमाणे इलेक्ट्रीकल विभाग प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा. स्थायी समिती समोर मेकॅनिकल विभागाकडील पत्र क्र.३२ ३८२ दि.३०/६/२०१७ अन्वये "अ" प्रमाणे आदेशास्तव सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**--***--**

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपलिका विद्युत विभागाकरिता मोटार व्हेईकल विभागामार्फत ई निविदा राबवून २ नग हायड्रोलिक गाडी खरेदी करणे बाबत चा प्रस्ताव आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- या बाबत सविस्तर माहिती सांगा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- हा विषय तर दोन वर्षा पासून चालू आहे.

मेकॅनिकल इंजी. श्री.निकम :- विद्युत विभागाकरीता मोटार व्हेईकल विभागामार्फत ई निविदा राबवून २ नगर हायड्रोलिक गाडी खरेदी करण्यात आलेल्या आहेत.त्यावरील बॉडी बसविणे कामी सुध्दा वर्क ऑर्डर देण्यात आलेली आहे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- कोणत्या कंपनीच्या गाडया आहेत.

मेकॅनिकल इंजी. श्री.निकम :- टाटा ४०७ गाडया आहेत.
मा.श्री. मुदस्सर शेख :- महानगरपालिकेस केव्हा तयार होवून मिळतील.
मेकॅनिकल इंजी. श्री.निकम :- दोन दिवसांमध्ये चेसीस आपल्याला मिळतील.
मा.श्री.दिलीप सातपुते :- त्यानंतर काय प्रोसेस आहे.
मेकॅनिकल इंजी. श्री.निकम :- अहमदाबाद येथे पाठवून वरील काम करून घ्यावे लागेल.
मा.श्री.दिलीप सातपुते :- कायआडचण आहे.
मेकॅनिकल इंजी. श्री.निकम :- वाढीव चार लाख नउ हजार रूपये खर्चास मंजूरीचा विषय आहे.
मा.श्री. मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.
मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.
मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपलिका विद्युत विभागाकरिता मोटार व्हेईकल विभागामार्फत २ नग हायड्रोलिक गाडी खरेदी करणे बाबत टाटा ४०७ वाहन खरेदी करीता रक्कम रूपये ९,०४,२०५ या प्रमाणे दोन वाहनां करीता रक्कम रू.१८,०८,५००/- खर्चअसून या वाहनांच्या चेसीवर हायड्रोलीक शिडी बांधणे करीता प्रतिवाहन खर्च रू.७,१८,२५०/- असे दोन वाहनांकरीता रू.१४,३६,५००/- एकूण रक्कम रूपये रू.३२,४५,०००/- खर्च आहे. स्थायी समिती सभा क्र.६ विषय क्र.८२ दिनांक ३/९/२०१६ रोजीच्या ठरावा नुसार रक्कम रूपये २८,३६,०००/-चे खर्चास स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.या कामी येणा-या वाढीव रक्कम रू.४,०९,०००/- च्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.सदरचा खर्च महानगरपालिकेच्या घसार निधी अंतर्गत भागविण्या यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपलिका विद्युत विभागाकरिता मोटार व्हेईकल विभागामार्फत २ नग हायड्रोलिक गाडी खरेदी करणे बाबत टाटा ४०७ वाहन खरेदी करीता रक्कम रूपये ९,०४,२०५ या प्रमाणे दोन वाहनां करीता रक्कम रू.१८,०८,५००/- खर्चअसून या वाहनांच्या चेसीवर हायड्रोलीक शिडी बांधणे करीता प्रतिवाहन खर्च रू.७,१८,२५०/- असे दोन वाहनांकरीता रू.१४,३६,५००/- एकूण रक्कम रूपये रू.३२,४५,०००/- खर्च आहे. स्थायी समिती सभा क्र.६ विषय क्र.८२ दिनांक ३/९/२०१६ रोजीच्या ठरावा नुसार रक्कम रूपये २८,३६,०००/-चे खर्चास स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे.या कामी येणा-या वाढीव रक्कम रू.४,०९,०००/- च्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदरचा खर्च महानगरपालिकेच्या घसार निधी अंतर्गत भागविण्या यावा. परंतू मा. शासनाकडील जी.एस.टी. अंमलबजावणी बाबतच्या दि.१९/८/२०१७ परिपत्रकानुसार वाहन चेसीवर हायड्रोलीक शिडी बांधणे कामी कार्यारंभ आदेश दिलेला नसल्याने भविष्यातील गुंतागुंत टाळणे कामी संबंधीत संस्थेला कार्यारंभ आदेश देण्यात येवू नये व या कामी नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री. मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ३५ सोमवार दि.२८/०८/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागामध्ये Cryoprecipitate व Single Donor Plateletes by Apheresis या रक्तघटकांचे दर निश्चिती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजूकर :-** अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभाग

संदर्भ :- मा. महासभा प्रस्ताव क्र. ४७ दिनांक २२/६/२०१० चा पारित ठराव

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार अहमदनगर मनपाच्या रक्तपेढी विभागामध्ये सध्या फक्तWhole Blood पिशवी वितरीत करण्यात येत आहे. अहमदनगर महानगरपालिकेस रक्तपेढी विभागाकरिता नाविन्य पुर्ण योजने अंतर्गत मा.जिल्हा नियोजन समिती अहमदनगर यांचेकडून एकुण रू.९२ लाख एवढा निधी निधी मंजूर झालेला आहे. त्या अनुषंगाने मनपाचे रक्तपेढी विभागामध्ये रक्त विघटन प्रयोगशाळा कार्यान्वीत होउन रक्तघटक वितरण सुरू होणार आहे. सध्या रक्तपेढी विभागाकरिता मा.महासभा प्रस्ताव क्र.४७ दिनांक २२/०६/२०१०च्या पारित ठरावानुसार खालीलप्रमाणे दर निश्चित करण्यात आलेला आहे.अहमदनगर मनपाच्या रक्तपेढी विभाग गरीब स्तरातील नागरिकांसाठी असुन महानगरपालिका कोणत्याही नफा तोटयाची बाजु न पाहता कमीत कमी दरामध्ये सदर सुविधा शहरातील तसेच शहराच्या जवळपासच्या खेडयातील नागरिकांसाठी पुरवित आहे.सध्या शहरातील खाजगी रक्तपेढीमध्ये खालीलप्रमाणे दर आकारले जातात.

रक्तपेढी विभागामध्ये घेण्यात येणा-या शुल्क व शहरातील खाजगी रक्तपेढी विभागातील दर पत्रकांचा तपशील

| अ.क्र | तपशील | मनपा रक्तपेढीचे दर | | शहरातील खाजगी रक्तपेढीचे दर | |
|---|---|---|---|---|---|
| | | सवलत पत्र असल्यास | सवलत पत्र नसल्यास | सवलत पत्र असल्यास | सलवत पत्र नसल्यास |
| १ | Whole Blood | ३५०/- | ५००/- | १२००/- | १३५०/- |
| | P.C.V. | ३५०/- | ५००/- | १२००/- | १३५०/- |
| | Platelets | ३५०/- | ५००/- | ४००/- | ५५०/- |
| | F.F.P. | ३५०/- | ५००/- | ४००/- | ५५०/- |
| | Cryoprecipitate | दर निश्चिती झालेले नाही | दर निश्चिती झालेले नाही | ४००/- | ५५०/- |
| | Single Donor Platelets by Apheresis | दर निश्चिती झालेले नाही | दर निश्चिती झालेले नाही | ९५००/- | १०,०००/- |

वरील तक्त्याप्रमाणे मनपाच्या रक्तपेढी विभागाकरिता अ.क्र.१ते४ चे दर निश्चित करण्यात आलेले आहेत तसेच सदरचे दर खाजगी रक्तपेढीच्या दरांचे तुलनेत अत्यल्प आहेत व तक्त्यातील अ.क्र.५व ६चे दर मनपाचे रक्तपेढीकरिता अद्यापपर्यत निश्चित करण्यात आलेले नाहीत.सदरच्या घटकांपैकी Cryoprecipitate हा रक्तघटक Fresh Frozen Plasma (F.F.P.)याघटकापासुन तयार करावा लागतो सदर प्रक्रियेस साधारण F.F.P.इतकाच खर्च अपेक्षीत असतो यास्तव सदर रक्तघटकांचे दर हे F.F.P. प्रमाणेच सवलत पत्र असल्यास रू.३५०/-व सवलत पत्र नसल्यास रू.५००/-याप्रमाणे निश्चित करणे उचित वाटते.

तसेच तक्त्यातील अ.क्र. ६ Single Donor Platelets by Apheresis तंत्रज्ञानाने एका रक्तदात्याच्या शरीरातील फक्त Platelets अफेरेसीस मशीनद्वारे काढल्या जातात व उर्वरीत रक्त रक्तदात्याच्या शरीरात परत पाठविले जाते सदर प्रक्रिया करणेसाठी प्रत्येक पिशवी करिता अंदाजे रू.५०००/- ते ७०००/- एवढया किंमतीचे किट आवश्यक असते व रक्तपिशवी होणा-या टेस्ट चा खर्च अंदाजे रू.५००/-

इतका अपेक्षीत आहे. सदर रक्तघटकाकरिता एका पिशवी करिता एकूण अंदाजे खर्च रू.७५००/- इतका अपेक्षित आहे.

तरी रक्तपेढी विभागाकरिता वरील सर्व बाबींचा विचार करता Cryoprecipitate व Single Donor Platelets by Apheresis या रक्तघटकांचे दर निश्चित करणेकामी प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे रक्तसंक्रमण अधिकारी यांचा रिपोर्ट असे.

यावर रक्तपेढी विभाग यांचा अभिप्राय की, CMO दर निश्चिती बाबत विभागाकडून निश्चित दर सुचित करून सादर करणे.

मा. फेरसादर,

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन परिपत्रक क्र. रारसे-२०१३ / प्र/.क्र.२२४ / आ-५ मुंबई -०१ दिनांक १८ जून २०१४ अन्वये राष्ट्रीय रक्तधोरण व्यवस्थित रित्या राबविणेबाबत रक्त व रक्तघटक पुरवठा यासाठी आकारण्यात येणा-या सुधारित सेवा शुल्क खालील प्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहेत.

| Sr .no | Description | Existing Govt. Charges | Revised Government Charges as per NBTC Guidelines |
|---|---|---|---|
| १ | Whole Blood | Rs. ४५०/- per unit | Rs. १०५०/- Per unit |
| २ | P.C.V. | Rs. ४५०/- per unit | Rs. १०५०/- Per unit |
| ३ | Platelets | Rs. ४५०/- per unit | Rs. ३००/- Per unit |
| ४ | F.F.P. | Rs. ४५०/- per unit | Rs. ३००/- Per unit |
| ५ | Cryoprecipitate | Rs. ४५०/- per unit | Rs. २००/- Per unit |

वरील प्रमाणे सदर शासन परिपत्रकानुसार रक्त व रक्तघटक पुरवठा यासाठी आकारण्यात येणा-या सुधारित दर निश्चिती कामी रक्तपेढीमार्फत ऑफिस प्रस्ताव दिनांक ११/८/२०१४ च्या मा.आयुक्त साहेब यांच्या मान्यतेने मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव ठेवण्यात आला होता. दिनांक १०/९/२०१४ च्या मा.स्थायी समितीच्या विषय क्रमांक ८८ नुसार सदर बाबत चर्चा होउन पुढील प्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव :- ऑफिस रिपोर्ट मध्ये नमूद केलेल्या संदर्भीय शासन निर्णय आणि परिपत्रके यानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढीमधुन वितरीत करण्यात येणारे रक्त व रक्त घटकांचे सुधारित शुल्क आकारणी करिता येईल किंवा कसे याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १९ च्या संदर्भाने मा. शासनाकडून मार्गदर्शन मागवुन घेवुन नंतर निर्णयार्थ मा. स्थायी समिती पुढे ऑफिस रिपोर्ट सादर करावा.

सदर ठरावानुसार रक्तपेढी जा.क्र.१३९ दिनांक १५/११/२०१४ ने सदर विषयाबाबत मा.उपसचिव , नगरविकास विभाग मंत्रालय , मुंबई-३२ येथे मार्गदर्शन मिळणेकामी पत्रव्यवहार केलेला आहे. परंतू अद्याप पावेतो याबाबत मा.शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही. त्यामुळे यापुर्वी मंजुरी दिल्यानुसार रू.३५०/- सवलत पत्र असल्यास व रू.५००/- सवलत पत्र नसल्यास या दराने रक्तपिशवी (Whole Blood) वितरीत केली आहे.

तक्त्यातील अ.क्र.५ व ६ चे दर मनपाचे रक्तपेढीकरिता अद्याप पर्यत निश्चित करण्यात आलेले नाहीत. सदरच्या तक्त्यातील रक्त घटकांपैकी अ.क्र. ५ Cryoprecipitate हया रक्तघटकांचे दर मा. शासनाच्या निर्देशानुसार रू.२००/- प्रति पिशवी असे असुन या मा. शासनाकडून अद्यापपर्यत याबाबत मार्गदर्शन प्राप्त न झालेमुळे Cryoprecipitate रक्तघटकांचे दर मनपाने निश्चित केल्यानुसार सवलत पत्र असल्यास रू.३५०/- व सवलत पत्र नसल्यास रू.५००/- याप्रमाणे निश्चित करणे उचित वाटते.

तसेच तक्त्यातील अ.क्र.६ Single Donor Platelets by Apheresis या रक्तघटकांचे दर मा. शासनाच्या दर निश्चितीच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये ठरविण्यात आलेले नसुन सदर रक्तघटकाचे दर ठरविणेकामी एका पिशवी करिता येणा-या खर्चाचा विचार करता प्रत्येक पिशवी करिता अंदाजे रू.५५००/- ते ७५००/- एवढया किमतीचे किट आवश्यक असते व रक्तपिशवी होणा-या टेस्टचा खर्च अंदाजे रू.५००/- इतका अपेक्षीत आहे. सदर रक्तघटकाकरिता एका पिशवी करिता एकूण अंदाजे खर्च रू.८०००/- इतका अपेक्षित आहे./अ

तरी रक्तपेढीविभागाकरिता वरील सर्व बाबींचा विचार करता Cryoprecipitate या रक्तघटकाकरिता सवलत पत्र असल्यास रू.३५०/-व सवलत पत्र नसल्यास रू.५००/-याप्रमाणे व Single Donor Platelets by Apheresis या रक्तघटकांकरिता रू. ८०००/- याप्रमाणे दर निश्चित करणे उचित वाटते.

तरी प्रस्ताव मान्यतेस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय फेरसादर.

येणेप्रमाणे रक्तसंक्रमण अधिकारी यांचा रिपोर्ट असे.

यावर आरोग्याधिकारी यांचा सहमती दर्शक सही

यावर उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार दर निश्चिती होणे उचित वाटते.

यावरअति.आयुक्तयांचा अभिप्राय की,रक्तसंक्रमण अधिकारी "अ" प्रमाणे कागदपत्रासह फेरसादर करावे.

मा.फेरसादर,

Single Donor Platelets by Apheresis या रक्तघटकाकरिता रक्तपेढी विभागाकडील Apheresis मशिन हे Terumo Penpol कंपनीचे आहे. सदर मशिन करीता त्याच कंपनीचे SDP Kit वापरणे आवश्यक आहे. सन २०१७-२०१८ या वर्षातील औषधे, रसायने, वैद्याकिय साहित्य यांच्या मंजूर टेंडर दर यादी मध्ये सदर किट चे दर मंजुर नाहीत. सदर किट बाबत Apheresis मशिनचे पुरवठादार विशाल एजन्सी यांचेकडून SDP Kit च्या दराबाबत माहिती घेतली असता Terumo Penpol कंपनीच्या एका SDP Kit ची किंमत रू.९,५००/- आहे त्याबाबत चे पत्र संबंधितांनी दिले आहे. तसेच शहरातील इतर खाजगी, धर्मार्थ व शासकीय रक्तपेढी कडून Single Donor Platelets by Apheresis च्या विक्री दराबाबत माहिती घेतली ती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | रक्तपेढीचे नाव | Cross Match Charges Rs | Issue Charges Rs | Concession (Camp/ Replacement) | Total Charges Rs |
|---|---|---|---|---|---|
| १ | जनकल्याण रक्तपेढी | १,०००/- | ९,०००/- | --- | १०,०००/- |
| २ | अष्टविनायक ब्लड बॅक | १,०००/- | ९,०००/- | --- | १०,०००/- |
| ३ | आनंदऋषी ब्लड बॅक | १,०००/- | ८,५००/- | ५००/- | ९,५००/- |
| ४ | अर्पण ब्लड बॅक | १,०००/- | ७,५००/- | ५००/- | ८,५००/- |
| ५ | शासकीय रक्तपेढी अ.नगर | Singel Donor | Platelets ची | सुविधा उपलब्ध | नाही |

सबब Terumo Penpol कंपनीच्या एका SDP Kit ची किंमत रू.९५००/- व रक्तजुळणी करीताचा खर्च रू.५००/- असा सदर रक्तघटकाच्या एका पिशवी करीता अंदाजे रू.१०,०००/- खर्च अपेक्षित आहे. तरी Single Donor Platelets by Apheresis या रक्तघटका करीता सवलती शिवाय रू.१०,०००/- (प्रति बॅग) असा दर निश्चित करणे उचित वाटते तथापि आदेशार्थ सविनय सादर/ब

येणेप्रमाणे रक्तसंक्रमण अधिकारी यांचा फेरसादर असे

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "ब" नुसार शिफारस

यावर मा.अति. आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, फेरसादर अहवालानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, कृपया मु.ले.प. मार्फत पासून सादर करावे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, १] अ.क्र.५ Cryoprecipitate या रक्त घटकाचे दर मनपा निश्चित केलेनुसार सवलत पात्र असल्यास रू.३५०/- व सवलत पात्र नसल्यास रू.५००/- प्रमाणे निश्चित करणेबाबत.,
२] अ.क्र.६ Single Donor Platelets by Apheresis या रक्तघटकाकरिता लागणा-या Terumo Penpol एका SDP Kit ची किंमत रू.९५००/- व रक्तजुळणी व तपासणी करिता रू.५००/- असे मिळून रक्त घटकाच्या एक पिशवीची करिता अंदाजे रू.१०,०००/- असा दर निश्चित करणेबाबत मा.स्थायी समितीपुढे ठेवणे योग्य राहिला.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागामध्ये Cryoprecipitate व Single Donor Plateletes by Apheresis या रक्तघटकांचे दर निश्चिती बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- या बाबत सविस्तर माहिती सांगा.

रक्तपेढी विभाग डॉ.रूपाली कुलकर्णी :- अहमदनगर महानगपालिकेच्या रक्तपेढी करीता रक्तविघटन प्रक्रिये करीता लागणारे उपकरणे आलेली आहेत.त्या संदर्भत मा.अन्न औषध प्रसासना मार्फत त्यांची तपासणी झालेली आहे.त्यांनी ज्या त्रुटी काढलेल्या होत्या त्यासुध्दा आपण पुर्ण केलेल्या आहे.त्याचा अहवाल सुध्दा आपण अन्न औषध प्रशासनाकडे देत आहोत.त्याचा परवाना मिळाल्या नंतर रक्त घटक सुविधा सुरू होणार आहे.प्लाझ्मा जो असतो एका रक्त पिशवी पासून आपण तीन रक्त घटक वेगळे करणार.रक्त,प्लाझ्मा,प्लेट लेट, वेगळया करून त्यातील दोन रक्त दर निश्चित नाही तो ठरविण्यासाठी स्थायी समिती मध्ये दिलेली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आपल्याला मान्यता आदयाप का मिळालेली नाही.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- इन्पेक्शन झाले आहे.त्यामध्ये त्रुटी काढल्या होत्या.ए.सी.चे काम त्यांनी केलेल्या सुचने नुसार करण्यात आले आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- म्हणजे मान्यता दयायला आपल्याला काही अडचण नाही.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- किरकोळ स्वरूपाच्या त्रुटी होत्या.त्यासर्वाची पुर्तता आपण केली आहे.त्यानुसार आपण प्रस्ताव अन्न औषध प्रसासनाकडे पाठविला आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आपण दर सुचविले आहे का?

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- आपण सिंगल डोअस प्लेट लेट आहे.ते नविन टेक्नीक आहे.रक्तदात्याचे एका साईडला त्याचे रक्त काढले जाते.दुस-या बाजुने ते पुन्हा शरिरात जाते.रक्तातील फक्त प्लेट लेट कढल्या जातात.त्याची किट च्या किंमतीची बाजारात चौकशी केली असता.सधारण: नउ हजार रूपयाला आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- एक किट किती जणांना वापरता येते.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- एक व्यक्ती साठी एका वेळी वापरता येते.डिसपोजल आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आपण काय रेट ठरविला त्याचा.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- आपण ९५००/-रू.पर्यत दर ठरविला आहे.बाकीचे क्रॉस मॅच वगैरे सर्व चार्ज धरून.इतर रक्तपेढी मधील माहितीघेतलेली आहे.त्यांचे सुध्दा दर साधारण: १०,०००/-रू. काहींचे ९,५००/- रू.८,५००/- असा आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- महानगरपालिकेला प्रॉफिट नाहि पाहिजे.त्या करीता जो खर्च आहे.तेव्हढाच घेतला पाहिजे.ना नफा ना तोटा या तत्वावर चालले पाहिजे.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- डॉक्टरांच्या मागणी नुसार सुविधा वाढविण्यात आल्या आहेत.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपार्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागामध्ये Cryoprecipitate व Single Donor Plateletes by Apheresis या रक्तघटकांचे दर निश्चिती बाबतचा Terumo Penpolकंपनीच्या एका SDP Kitची किंमत रू.९५००/- व रक्तजुळणी करीताचा खर्च रू.५००/असा सदर रक्तघटकाच्या एका पिशवी करीता अंदाजे रू.१०,०००/- खर्च अपेक्षित आहे.तरी Single Donor Platelets byApheresis या रक्तघटका करीता सवलती शिवाय रू.१०,०००/- (प्रति बॅग) असा दर निश्चित करण्यास व Cryoprecipitate या रक्त घटकाचे दर मनपा निश्चित केलेनुसार सवलत पात्र असल्यास रू.३५०/- व सवलत पात्र नसल्यास रू.५००/- प्रमाणे निश्चित करणेस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभागामध्ये Cryoprecipitate व Single Donor Plateletes by Apheresis या रक्तघटकांचे दर निश्चिती बाबतचा Terumo Penpol कंपनीच्या एका SDP Kit ची किंमत रू.९५००/- व रक्तजुळणी करीताचा खर्च रू.५००/- असा सदर रक्तघटकाच्या एका पिशवी करीता अंदाजे रू.१०,०००/- खर्च अपेक्षित आहे. तरी Single Donor Platelets by Apheresis या रक्तघटका करीता सवलती शिवाय रू.१०,०००/- (प्रति बॅग) असा दर निश्चित करण्यास व Cryoprecipitate या रक्त घटकाचे दर मनपा निश्चित केलेनुसार सवलत पात्र असल्यास रू.३५०/- व सवलत पात्र नसल्यास रू.५००/- प्रमाणे निश्चित करणेस ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ३६ सोमवार दि.२८/०८/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत कलम ३८१ व ३८२ अन्वये मांस विक्रेतांना परवाने देण्यांबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजूकर :-** अहमदनगर महानगरपालिका आरोग्य विभाग

रिपोर्ट देण्यांत येते की, मा. राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांचे कोर्टात बुरूडगांव कचरा डेपोबाबत दाखल याचिकेमध्ये मा. कोर्टाने शहरातील अनाधिकृत कत्तलखाने व त्यापासून निर्माण होणा-या कच-याबाबत (Animal Waste) मनपा प्रशासनाकडून तातडीने कार्यवाही करणेचे आदेश दिलेले व्यवसायीक उदा. खाजगी चिकन विक्रेते, खाजगी मटन विक्रेते, खाजगी बीफ विक्रेते, खाजगी पोर्क विक्रेते , खाजगी मांस विक्रेत तसेच मटन, बीफ, फीश मार्केट मधील गाळा धारक व्यवसायीक यांनी महाराष्ट्र महानगरपालिका कायदा १९४९ अंतर्गत प्रकरण १९ बाजार व कत्तलखाने या अंतर्गत कलम ३२७ ते ३४० अंतर्गत बाजार व कत्तलखाने यांचे परिक्षण व नियमन करणे बाबत तरतुद आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८१ व ३८२ अन्वये मांस व मासळी विक्री करीता परवाना देण्याची तरतुद आहे. कलम ३८१ व ३८२ खालील प्रमाण् आहे.

कलम ३८१- बाजाराव्यतिरिक्त अन्य जागी जनावरे इत्यादी विकण्यास मनाई :-

आयुक्ताकडून लायसन्स घेतल्यासशिवाय कोणत्याही व्यक्तीस-

(अ) नगरपालिकेच्या किंवा खाजगी बाजाराव्यतिरिक्तअन्य कोणत्याही जागी, मानवी आहारासाठी योजलेले कोणतेही चतुष्पाद जनावर किंवा कोणतेही मांस किंवा मासळी विकता येणार नाही किंवा विक्रीसाठी मांडता येणार नाही.

(ब) नगरपालिका किंवा खाजगी बाजार किंवा लायसन्स दिलेले खाद्यगृह किंवा मिठाईचे दुकान याव्यतिरिक्त अन्न कोणत्याही जागी,आईसक्रीम, आणि वायुमिश्रित पेये, कुल्फी , उसाचा रस फोडी केलेली किंवा सोललेली फळे आणि भाजीपाला, कोणतीही मेवामिताई किंवा मिठाई किंवा आयुक्त जाहिर सूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील असे मानवी आहारासाठी योजलेले अन्य शिजवलेले अन्न किंवा अन्य पदार्थ विकता येणार नाहीत किंवा विक्रीसाठी मांडता येणार नाहीत.

कलम ३८२ - खाटीक आणि जनावरांचे मांस विकणा-या व्यक्ती यांना लायसन्स देणे-

कोणत्याही व्यक्तीस, याबाबत आयुक्ताने लायसन्सशिवाय, किंवा लायसन्सच्या अटीस अनुसरून असेल त्याव्यतिरिक्त अन्य रीतीने-

(अ) शहरात, किंवा कोणत्याही नगरपालिका कत्तलखान्यात खाटकाचा व्यवसाय चालवता येणार नाही.

(ब) शहरातील कोणतीही जागा मानवी आहारासाठी योजलेल्या कोणत्याही जनावरांच्या मांसाची विक्री करण्यासाठी किंवा शहराबोहरील कोणतीही जागा, शहरात खपचेण्यासाठी अशा मांसाची विक्री करण्यासाठी वापरता येणार नाही.

सध्या स्थितीत अहमदनगर महानगरपालिका कडून वरील कलमा अंतर्गत परवाने देण्यात येते नाही. सदर कायद्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. जेणेकरून मांस विक्रेत्यावर नियंत्रण ठेवणे तसेच संबंधीताला परवाने देणे व त्या अनुषंगे नवी आरोग्य परवानाची आरोग्य परवाना नुतणीकरण, आरोग्य परवाना नुतणीकरण विलंब तडजोड फी इत्यादी द्वारे महानगरपालिकेला उत्पन्न मिळू शकेल. तरी सदर कामी पुणे महानगरपालिका यांच्याकडून सर्वसाधारण माहिती या प्रकरणी घेतलेली आहे. त्या अनुषंगे सादर करावयाची कागदपत्रे खालील प्रमाणे आहे.

१] आरोग्य परवानासाठी लागणा-या आवश्यक कागदपत्रांची यावी.

२] परवाना फी तक्ता

३] नवीन आरोग्य परवाना अर्जाचा

४] आरोग्य परवाना नुतणीकरण करण्याचा अर्जाचा नमुना

५] आरोग्य परवाना नमुना, सोबत जोडलेला आहे.

तरी सदर प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका कायदा १९४९ अंतर्गत आरोग्य परवाना मंजूर करणेकामी , आरोग्य परवाना शुल्क दर ठरविणे उचित वाटते. आरोग्य परवाना शुल्क दर तक्ता खालील प्रमाणे प्रस्तावीत आहे. तक्ता- ( वार्षिक आरोग्य परवाना शुल्क )

| अ.क्र. | मनपा अधियिम | तपशिल | आवश्यक कागदपत्रे | प्रस्तावीत दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र मनपा अधियिम कलम ३८१ अ व ३८२ ब | मटण, बीफ, चिकन, पोर्क यांना खाजगी आरोग्य परवाना देणे | * वैद्यकीय आरोग्याधिकारी यांचे नाव छापील अर्ज<br>*३ ब्ल्युप्रिंट नकाशे<br>* प्रॉपर्टी टॅक्स भरल्याची पावती<br>* व्यवसायिक दराचे नळ कनेक्शन<br>* जागेचा उतारा / संमतीपत्र<br>* जागा गवनिमध्ये असल्यास बिगर निवासी सेवा शुल्का प्रियिम फी भरल्याची पावती<br>* भोगवाटा पत्र / गुंठेवारी दाखला | आरोगय परवाना बाबींची पुर्तता व जागा अरोग्य दृष्टया योग्य असल्यास रू.१०००/- प्रतिवर्ष आरोग्य परवाना फी घेवून आरोग्य परवाना देणे | |
| २ | महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम ३८१ अ व ३८२ ब | मांसळी विक्रीसाठी खाजगी जागेत आरोग्य परवाना देणे | * वैद्यकिय आरोग्यधिकारी यांचे नावे छापील अर्ज<br>*३ ब्ल्युपिंट नकाशे<br>*प्रॉपर्टी टॅक्स भरल्याची पावती<br>*व्यवसायिक दराचे नळ कनेक्शन<br>*जागेचा उतारा/संमतीपत्र<br>*जागा गवनिमध्ये असल्यास बिगर निवासी सेवा शुल्क व प्रिमियम फी भरल्याची पावती भोगवटा पत्र/गुंठेवारी दाखला | रू.४००/- आरोग्य परवाना फी+विलंब शुल्कासह नुतनीकरण करणे (पहिल्या ६ महिन्यासाठी शुल्काच्या ५० टक्के विलंब फी व दुस-या ६ महिन्यासाठी शुल्काच्या १०० टक्के) | |
| ३ | महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम ३८१ अ व ३८२ ब | मटण बीफ,चिकन पोर्क आरोग्य परवाना नुतणीकरण करणे | * वैद्यकिय आरोग्यधिकारी यांचे नावे छापील अर्ज<br>* प्रॉपर्टी टॅक्स भरल्याची पावती<br>*जागा गवनिमध्ये असल्यास बिगर निवासी सेवा शुल्क व प्रिमियम फी भरल्याची पावती भोगवटा पत्र/गुंठेवारी दाखला<br>*जागेचा उतारा/संमतीपत्र | रू.१०००/- आरोग्य परवाना नुतणीकरण फी | |
| ४ | महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम ३८१ अ व ३८२ ब | मटण बीफ,चिकन पोर्क आरोग्य परवाना नुतणीकरण विलंब शुल्कासह करणे | * वैद्यकिय आरोग्यधिकारी यांचे नावे छापील अर्ज<br>* प्रॉपर्टी टॅक्स भरल्याची पावती<br>*जागा गवनिमध्ये असल्यास बिगर निवासी सेवा शुल्क व प्रिमियम फी भरल्याची पावती भोगवटा पत्र/गुंठेवारी दाखला<br>*जागेचा उतारा/संमतीपत्र | रू.१०००/- आरोग्य परवाना नुतणीकरण फी + विलंब शुल्कासह नुतनीकरण करणे (पहिल्या ६ महिन्यासाठी शुल्काच्या ५० टक्के विलंब फी व दुस-या ६ महिन्यासाठी शुल्काच्या १०० टक्के) | |

**आरोग्य परवाना मिळणे बाबत कार्यपध्दती खालील प्रमाणे राहिल**

१) नविन कायम/हंगामी आरोग्य परवाना घेणेकरीता नागरीकांनी सर्वप्रथम ज्या प्रकारचा व्यवसाय करायचा आहे त्या संबंधित फॉर्म घेणे आवश्यक आहे.तो फॉर्म संपुर्ण भरून आवश्यक त्या कागदपत्रांसह जोडून महानगरपालिका माहिती सुविधा केंद्रात जमा करणे आवश्यक आहे.

२) संबंधित अर्ज संबंधित आरोग्य निरीक्षक / मुख्य स्वच्छता निरीक्षक यांच्याकडे आल्यानंतर कागदपत्रांची पडताळणी करून संबंधित
जागेची पहाणी केली जाते.

३)आरोग्य निरीक्षक / मुख्य स्वच्छता निरीक्षक यांच्या स्वाक्षरीनंतर तो अर्ज अंतिम मान्यते करीता वैद्यकिय आरोग्यधिकारी तथाआरोग्य विभाग प्रमुख,मुख्य कार्यालयाकडे यांच्या मान्यतेकरीता येवून अर्जावर योग्य त्या शिफारशीसह स्वाक्षरी होते.

४)सदर अर्ज मंजूरीनंतर त्याबाबत फी भरण्यासाठी मनपा अहमदनगर माहिती सुविधा केंद्राकडे फी भरणे आवश्यक आहे.

५)अंतीम परवाना वैद्यकीय आरोग्यधिकारी यांचे स्वाक्षरी नंतर मनपा अहमदनगर माहिती सुविधा केंद्रामार्फत संबंधितांना देण्यात येईल.

**हंगामी आरोग्य परवान्या बाबत.**

१)व्यवसायाची जागा मालकी हक्काची नसल्यास तसेच गवनि अंतर्गत असल्यास त्या व्यवसायांना ११महिने मुदतीसाठी हंगामी परवाना देण्यांत येतो.२)व्यवसायाची जागा भाडे करार तत्वावर असल्यास करारनामा दुय्यम निबंधक कार्यालयाकडे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.३)जागा भाडयाने असल्यास चालू महिन्याची भाडे पावती व जागा मालकाचे लेखी संमतीपत्र असणे आवश्यक आहे.४)व्यवसाय हा कंपनी मार्फत चालविण्यात येत असल्यास कंपनीच्या MOU नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.५)भागीदारी स्वरूपाचा व्यवसाय असल्यास भागीदारी पत्र नोंदणीकत असणे आवश्यक आहे.६)व्यवसाय हा संस्थेमार्फत चालविण्यास येत असल्यास संस्थेच्या पदाधिका-यांच्या नावं परवाना दिला जातो.पदाधिकारी बदलल्यास संस्थेचा ठराव व अर्ज घेवून परवाना धारकाच्या नावात बदल करण्यात येतो.

**परवाना हस्तांतरण करतांना**

1) परवाना धारक हयात असल्यास संमतीपत्र व अन्य वारसांचे प्रतिज्ञापत्र आवश्यक.
2) परवाना धारक हयात नसल्यास परवाना रद्द केला जातो.
3) भागीदारांची नावे कमी जास्त करतांना भागीदारी पत्र दुरूस्तीसह सादर करणे आवश्यक आहे.

**नुतनीकरणाची पध्दत**

1) वर उल्लेखित सर्व कायम / हंगामी आरोग्य परवान्याचे व्यवसाय चालू ठेवणे असल्यास प्रति वर्षी नुतनीकरण करणे बंधनकारक आहे.

**परवाना रद्द पध्दत**

परवाना धारक प्रचलीत कायदा / नियम यांचे उल्लंघन करीत असल्यास परवाना रद्द होण्यास पात्र राहिल.

पुणे महानगरपालिका येथे समक्ष जावून या प्रक्रियेची माहिती घेतली असता पुणे महानगरपालिकेमध्ये वरील प्रमाणे कार्यपध्दती अवलंविली जात आहे.मा.हरित लवाद,पुणे यांचे आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी करावयाची झाल्यास शहरातील मांस विक्रेते/चिकन विक्रेते/मासळी विक्रेते/मटन,चिकन,मासळी शॉप इत्यादींना महानगरपालिका अधिनियमाच्या कार्यकक्षेत आणणे आवश्यक आहे.करिता सर्व संबंधितांना परवाना घेणे सक्तीचे करून परवान्याच्या अटी- शर्तीनुसार पुणे महानगरपालिकेच्या धरतीवर परवाना घेणे बंधनकारक करणे योग्य वाटते.

तसेच परवान्याबाबत आवश्यक दर निश्चिती करिता मा.स्थायी समितीसमोर सदरचे प्रकरण मंजूरीसाठी पाठविणेस प्रस्ताव सविनय सादर.

येणे प्रमाणे अन्नसुरक्ष अधिकारी यांचा अहवाल असे.

यावर वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की,प्रस्तावानुसार अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात व्यवसाय करणा-या सर्व संबंधितास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीप्रमाणे परवाना/लायसन्स घेणे बंधनकारक आहे.तथापि त्याबाबतची कार्यपध्दती मंजूर करून घेणे कामी मा.स्थायी समिती पुढे ठेवणे उचित वाटते.तथापि आदेशार्थ सादर.

यावर अंतर्गतलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,प्रस्तावाचे अवलोकन करता प्रस्तावित बाब ही संपुर्णतः वैधानिक व धोरणात्मक स्वरूपाची असल्याने अन्न सुरक्षा अधिकारी व मा.वैद्यकिय अधिकारी यांचे अभिप्रायानुसार **अ** प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,ES४५AI यांचे अधिनियम २००६ खात्री करून यथा प्रस्तावित केल्या नुसार मा.स्थायी समिती मान्यता घेणे आवश्यक राहिल.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,यथाप्रस्तावितनुसार प्रस्तावित नियमावली मान्यतोस्तव मा.स्थायी समिती सभेसमोर ठेवणेबाबत उचित आदेशार्थ सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या अहवालाप्रमाणे **अ** नुसार मान्येतेस्तव स्थायी समितीकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत कलम ३८१ व ३८२ अन्वये मांस विक्रेतांना परवाने देण्यांबाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- या बाबत सविस्तर माहिती सांगा.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- शहरामध्ये मटन,मांस,विक्रेते आहेत हरित लवादाकडे केस चालू होती त्यावेळी कत्तल खान्याविषयी कमेंट केले होते कत्तल खाने आहेत,कुत्री आहेत त्यामुळे अडचणी निर्माण होत आहेत.त्याबाबत आम्ही पुणे महानगरपालिकेमध्ये व्हिजीम दिली.त्याच्या आरोग्य विभागध्ये ज्या आस्थापना असतात चिकन,मांस,मच्छी यांचे जे विक्रेते आहेत त्यांना ते लायसन्स देतात,लाससन्स देणे बंधनकारक आहे त्यांचे जे वेस्ट मटेरियल आहे ते महानगरपालिका त्यांचे लाससन्स पाहून वेस्ट मटेरियल उचलण्यास सोपे जाणार आहे.त्यांचा जो कचरा आहे.तो कुटेही उकिरडयावर फेकून देणार मग तेथे कुत्री होणार,कुत्री हिंस्त्र होणार मगते चावणार हया सर्व गोष्टीवर त्यांना लायसन्स दिल्यानंतर नियंत्रणात येतील.आज सर्व ठिकाणी ते घाण करीत आहेत.त्याचे रेकॉर्ड कुठेच नाही.कुटेही रस्त्यावर अतिक्रमण जागेवरील ती टपरी असते.यावर आपले नियंत्रण राहिले नाही.यामध्ये आपण अटी व शर्ती मध्ये हा व्यवसाय करायचा असल्यास जागा स्वत:ची असावी,त्याचे जे मटण मार्केट आहे तेथे स्वच्छता ठेवावी.त्यांच्या वर आपला कंट्रोल रहील,त्यांचे कडून आपल्याला लायसन्स फि सुध्दा वसूल करता येईल.त्याचा वापर आपल्याला कच-याची विल्हेवाट लावणे करता येईल त्या करीता आपण प्रस्ताव सादर केला आहे.यामधील जो कर निश्चितीचा विषय आहे.१०००/-रू.ठेवली आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- लासयन्स फि रू.५०००/- ठेवली तर चालेल का?

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- करता येईल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- जे मटन,मच्छी विक्रेते आहेत त्यांच्या करीता काही नियमावली करा,तेथे स्वच्छता ठेवण्यात यावी.डि फ्रिज आवश्यक असेल माश्या बासणार नाही याची दक्षता घ्यावी.स्वच्छता पाहिजे,येथे पाहिले तर खायची सुध्दा होत नाही.

मा.श्री.दिलीप सातपुते :- सध्या यांचे कडे लायसन्स नाही का?

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- नाही सध्या लायसन्स नाही.

मा.श्री.दिलीप सातपुते :- या पुर्वी हा विषय आला नव्हता.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- या पुर्वी आपल्या कडे फुड ॲण्ड ड्रग चे लायसन्स होते.भेसळ प्रतिबंधक कायदा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- किती दुकानदार असतील नगर शहरात.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- ५०० ते ७०० च्या दरम्यान दुकाने असू शकतात.

मा.श्री.दिलीप सातपुते :- त्यांनी जर पैसे भरले नाही तर आपण काय कारवाई करणार.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- आपण त्यांचेवर दंडात्मक कारवाई करू शकतो.

मा.श्री.दिलीप सातपुते :- तुम्ही रू.१०००/- प्रस्तावीत केले कशाच्या आधारावर केले.ही रक्कम कमी होते.त्यांचे कच-याची विल्हेवाट आपण लावणार आहे.ते त्यांच्या पैशानी विल्हेवाट लावणार नाहीत.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- लायसन्स देणे बाबतची नियमावली वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.दिलीप सातपुते :- या विक्रेत्यांकडे चांगल्या प्रकारची स्वच्छता ठेवण्या बाबत सुचना देण्यात याव्यात.व्हाईट टाईल्स लावाव्यात.महानगरपालिकेची आर्थिक स्थीती पहाता रक्कम रू.५०००/- वर्षा करीता लायसन्स फि ठेवावी.सर्व दुकानदारांना एक महिन्या

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- यांची कटींग, स्लॉटर हाउस चे काय झाले.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- कोंबडयाचे जे आहे

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- कोंबडयांचे ठिक आहे.बोकड सुध्दा तेथेच कापतात.स्लॉटर हाउच्या बाबतीमध्ये माहिती दया.स्लॉटर हावूस साठी पैस आलेला आहे का.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- दोन तीन वर्षा पुर्वी आलेला होता, कलेक्टर ऑफिस मध्ये.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- स्लॉटर हाउस करीता साधारण दोन तीन वर्षा पूर्वी ९५ लाख रूपये आले होते.ते परत गेले कारण त्याठिकाणी पालकमंत्र्यांनी विरोध केला.तत्कालीन पालक मंत्री मा.ना.पाचपुते साहेबांकडे स्थानिक नागरीकांनी तक्रार केली.मा.ना.पाचपुते साहेबांनीची त्या जागेबाबत शिफारस केली होती.बुरूडगांवच्या नागरीकांनी विरोध केला.पैसे आपल्याला सॅक्शन केले होते.दिले नव्हते.अनुदान आपल्याकडे प्राप्त झाले नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- महानगरपालिकेच्या मालकीचे स्लॉटर हाउस झाले असते.पैसे होते सर्व काही असतांना स्लॉटर हाउस होवू शकेले नाही.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- त्या ठिकाणी जागा देण्यास विरोध होता.नगररचना विभागाने जागा उपलब्ध करून दिल्यास प्रश्न मार्गी लागू शकतो.

मा.बाळासाहेब बोराटे :- पैसा कसा उपलब्ध करणार.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- या करीता ५० टक्के सेंन्ट्रल गर्व्हरमेंटचे फुड प्रोसेसिंग करीता अनुदान मिळते.पण आपल्याकडे जागा उपलब्ध नाही.

मा.श्री.दिलीप सातपुते :- आपल्याकडे ज्या योजनांसाठी पैसे पडूण आहेत.ते कामे होत नाहीत.

प्रकल्प विभाग प्रमुख श्री.मेहेत्रे :- या करीता महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये जागा मिळाणारा नाही.आउट साईमध्ये कोठे तरी जागेचा शोध घ्यावा लागेल.महानगरपालिकेच्या हद्दीलगत असलेल्या गावांमध्ये जागा दिल्याबाबतचा ग्रामपंचायतीचा ठराव लागतो.कोणतीही ग्रामपंचायत ठराव देत नाही.

वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- मागे तत्कालीन आयुक्त श्री.गावडे साहेब असतांना चर्चा झाली होती.पिंपळगांव येथे कुत्र्याचे युनीट आहे.त्याच ठिकाणी एका कोप-यामध्ये जागा उपलब्ध आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- आपल्या मालकीची जागा असल्यास ठरावाची गरज लागणार नाही.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मा.आयुक्त साहेब,तुम्ही या विषयाबाबत पुढाकार घ्या,९५ लाख डीपीटीने मंजूर केले होते ते परत गेले.जागा उपलब्ध झाली असतीतर आज स्लॉटर हाउस झाले असते.यावर चर्चा केली असती तर विषय मार्गी लागला असता.या विक्रेत्यांना आपण लायसन्स देणार,तेथेच ते बोकडे कापणार,त्यांचे वेस्टेज तेथेच टाकणार त्यामुळे परिसरामध्ये घाण होवून रोगराई पसरणार.कापलेले प्राणी उघडयावर त्याची ने आण करतात, हा किळसवाणा प्रकार आहे.याला प्रतिबंध करा.कडक नियमावली करा.कोणाच्या भावणादुखावणार नाही याची काळजी घ्या.नुसत्या नियमावली करून उपयोग नाही त्याचे कडक पालन झाले पाहिजे.

मा.श्री.मुदस्सर शेखः- महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती पहाता वार्षीक फी ३५००/- करण्यात यावी. परवान्या करीता आपण फि आकारण्यात येणार असल्याने शहरातील मांस विक्रेते/चिकन विक्रेते/मासळी विक्रेते/मटन,चिकन,मासळी शॉप इत्यादींपासुन निर्माण होणारा कचरा (Animal Waste) संकलन व वाहतुक करण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेचे बायोमेडीकल वेस्ट करीता सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मे. बायोक्लीन सिस्टीम (इंडिया) प्रा.लि. या कंपनी मार्फत परवानाधारका कडून कचरा (Animal Waste) संकलन व वाहतुक करून घेणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- शहरातील मांस विक्रेते/चिकन विक्रेते/मासळी विक्रेते/मटन,चिकन,मासळी शॉप इत्यादींना महानगरपालिका अधिनियमाच्या कार्यकक्षेत आणणे आवश्यक असल्याने सर्व संबंधितांना परवाना घेणे सक्तीचे करून परवान्याच्या अटी- शर्तीनुसार परवाना घेणे बंधनकारकर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत कलम ३८१ व ३८२ अन्वये मांस विक्रेतांना परवाने देण्यांबाबत ऑफिस रिपोर्ट नुसार व कलम ३८१ व ३८२ प्रमाणे व मा.हरित लवाद,पुणे यांचे आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी करावयाची झाल्यास शहरातील मांस विक्रेते/चिकन विक्रेते/मासळी विक्रेते/मटन,चिकन,मासळी शॉप इत्यादींना महानगरपालिका अधिनियमाच्या कार्यकक्षेत आणणे आवश्यक असल्याने सर्व संबंधितांना परवाना घेणे सक्तीचे करण्यात येवून परवान्याच्या अटी- शर्तीनुसार परवाना घेणे बंधनकारकर करण्यात यावेत.तसेच परवान्याबाबत रक्कम रूपये ३५००/- वार्षीक आरोग्य लायसन्स फि आकारण्यात यावी. त्याअनुषांगाने विलंब आकार शुक्ल व इतर शुक्ल दर निश्चित करून त्यानुसार लायसन्स फि आकारण्यास ही सभा मान्यता देत आहे.

शहरातील मांस विक्रेते/चिकन विक्रेते/मासळी विक्रेते/मटन,चिकन,मासळी शॉप इत्यादींपासुन निर्माण होणारा कचरा (Animal Waste) संकलन व वाहतुक करण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेचे बायोमेडीकल वेस्ट करीता सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मे. बायोक्लीन सिस्टीम (इंडिया) प्रा.लि. या कंपनी मार्फत परवानाधारका कडून कचरा (Animal Waste) संकलन व वाहतुक करून घेणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**ठरावः-** ऑफिस रिपोर्ट नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत कलम ३८१ व ३८२ अन्वये मांस विक्रेतांना परवाने देण्यांबाबत व कलम ३८१ व ३८२ प्रमाणे व मा.हरित लवाद,पुणे यांचे आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी करावयाची झाल्यास शहरातील मांस विक्रेते/चिकन विक्रेते/मासळी विक्रेते/मटन,चिकन,मासळी शॉप इत्यादींना महानगरपालिका अधिनियमाच्या कार्यकक्षेत आणणे आवश्यक असल्याने सर्व संबंधितांना परवाना घेणे सक्तीचे करण्यात येवून परवान्याच्या अटी- शर्तीनुसार परवाना घेणे बंधनकारकर करण्यात यावेत.तसेच परवान्याबाबत रक्कम रूपये ३५००/- वार्षीक आरोग्य लायसन्स फि आकारण्यात यावी. त्याअनुषांगाने विलंब आकार शुक्ल व इतर शुक्ल दर निश्चित करून त्यानुसार लायसन्स फि आकारण्यास ही सभा मान्यता देत आहे.

शहरातील मांस विक्रेते/चिकन विक्रेते/मासळी विक्रेते/मटन,चिकन,मासळी शॉप इत्यादींपासुन निर्माण होणारा कचरा (Animal Waste) संकलन व वाहतुक करण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेचे बायोमेडीकल वेस्ट करीता सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मे. बायोक्लीन सिस्टीम (इंडिया) प्रा.लि. या कंपनी मार्फत परवानाधारका कडून कचरा (Animal Waste) संकलन व वाहतुक करून घेणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ३७ सोमवार दि.२८/०८/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे उघडयावर शौचास बसणेकामी प्रतिबंध करणा-या कामी नेमणुक करण्यात आलेल्या पथकामार्फत दंडात्मक कारवाईत प्राप्त रक्कमेचा निम्मा हिस्सा (निम्मी रक्कम) गुडमॉर्निग पथकातील कर्मचा-यास प्रदान करणेबाबत ऑफिस रिपोर्ट .

**प्रस्तावाचा मजूकर :-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभाग

मा.सादर,

उपरोक्त विषयान्वे प्रस्ताव सादर करण्यात येतो की,केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची अंमलबजावणी सुरू आहे.सदर अभियानात स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राज्यातील शहरांमधील उघडयावर शौचकरण्याची प्रथा बंद करून शहरे हागदारी मुक्त करण्यासंदर्भात सुचना आहे.त्यानुसार प्रभाग समिती कार्यालय निहाय चार सफाई कामगार (दोन महिला व दोन पुरूष )यांच्या सोबत एक केअरटेकर असे पाच कर्मचा-यांची गुडमॉर्निग पथक निर्माण करण्यात आले आहे.

त्यानुसार प्रभाग समिती कार्यालय क्र.१ ते ४ मध्ये रोज सकाळी उघडयावर शौचास बसणा-या नागरीकांना प्रतिबंध करणेबाबत कार्यवाही चालु आहे.तसेच जे नागरीक नजर चुकवुन उघडयावर शौच विधी करतांना निदर्शनास आल्यास त्या नागरीकांकडून रक्कम रू.२००/-ची दंडात्मक कारवाई करून रक्कम वसुल करण्यात येत आहे.

सबब नेमण्यात आलेल्या पथकामधील ज्या कर्मचा-यानी सदरची दंडात्मक रक्कम वसुल केली असेल अशा कर्मचा-यास वसुल करण्यात आलेल्या दंडाच्या रक्कमेतुन निम्मी रक्कम कर्मचा-यांना प्रोत्साहीत करणे कामी देणे उचित वाटते.

तथापी उघडयावर शोचास बसणेकामी प्रतिबंध करणा-या कामी नेमणुक करण्यात आलेल्या पथका मार्फत दंडात्मक कारवाई प्राप्त रक्कमेचा निम्मा हिस्सा (निम्मी रक्कम ) गुडमॉर्निग पथकातील कर्मचा-यास प्रदान करणे मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर./अ

येणे प्रमाणे मुख्य स्वच्छता निरिक्षक यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय कि,दि.२०/०५/१७ रोजी च्या कार्यशाळेत चर्चेनुसार व आपणाशी झालेल्या चर्चे मध्ये किमान रू.२००/- ते रू.५००/- पर्यत दंड उघडयावर बसणा-यास आकारण्यात आली तर त्यापैकी निम्मी रक्कम संबंधीत पकडणा-या कर्मचा-यास देणेस हरकत नाही.मे.आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,कृपया मुख्यलेखापरिक्षक यांच्या मार्फत सादर करावे.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अहवाल की,प्रस्तुत बाब ही धारणात्मक स्वरूपाची असून मनपाचा आर्थीक परिस्थीती नुसार वरील प्रशासकीय पातीळीवर नर्णय उचित राहील.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,यथाप्रस्तावितनुसार फेरसादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,मा.स्थायी समिती समोर ठेवावे.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे उघडयावर शौचास बसणेकामी प्रतिबंध करणा-या कामी नेमणुक करण्यात आलेल्या पथकामार्फत दंडात्मक कारवाईत प्राप्त रक्कमेचा निम्मा हिस्सा (निम्मी रक्कम) गुडमॉर्निग पथकातील कर्मचा-यास प्रदान करणेबाबत ऑफिस रिपोर्ट .

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दिलीप सातपुते :-ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.साभापती साहेब :-ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे उघडयावर शौचास बसणेकामी प्रतिबंध करणा-या कामी नेमणुक करण्यात आलेल्या पथकामार्फत दंडात्मक कारवाईत प्राप्त रक्कमेचा निम्मा हिस्सा (निम्मी रक्कम) गुडमॉर्निग पथकातील कर्मचा-यास प्रदान करणेबाबत ऑफिस रिपोर्टास ही सभा मान्यता देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ३८ सोमवार दि.२८/०८/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतुन फिरते शौचालय -१० सीटचे (५ पुरूष व ५ स्त्री) ट्रॅक्टर ट्रॉली पध्दतीचे -२ नग खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १४४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजूकर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

**संदर्भ :-** ई-निविदा क्र.१०१४

विनंती रिपोर्ट की,अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी फायबर डस्टबीन,लोखंडी कचरा ढकलगाडी,हेवी डयुटी मेटॅलिक हँण्ड कार्ट,फायबर युरिनल,फिरते शौचालय इ.पुरवठा वार्षिक निविदा दर मंजुरी करिता मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांकःमातसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९ सामन्य प्रशासन विभाग मंत्रालय,मुंबई - ४०००३२ दि.६ ऑगस्ट २०१० अन्वये ई-निविदा कार्यप्रणालीचा अवलंब करुन जाहिर टेंडर नोटीस प्रसिद्ध करुन वार्षिक निविदा मागविल्या असता मुदतीत -

१)एक्सल फायब्रोटेक प्रा.लि.,नागपूर

२)निलकमल लिमिटेड.,मुंबई

३)एस.एस.एंटरप्राईजेस,नाशिक

याप्रमाणे ३ (तीन) निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

यापुर्वी जा.क्र.घनकचरा व्यवस्थापन विभाग-७१५ दि.२२/०१/२०१६ चे मंजुरी प्रस्तावान्वये ई-निविदा क्र.१०१४ नुसार अंदाजपत्रकिय तरतूद सन.२०१६-१७ लेखाशिर्ष - नविन फिरते शौचालय खरेदी या तरतुदी अन्वये मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब यांचे दि.२६/०७/२०१६ चे मान्यतेने निविदाकार एस.एस.एंटरप्राईजेस,नाशिक यांना स्टोअर विभाग जा.क्र.११० दि.०९/०८/२०१६ अन्वये चारचाकी चासीवर आर.टी.ओ.नियमानुसार १० सीटचे फिरते शौचालय २० मि.मी.जाडीच्या पॅनेलवर १.५ मि.मी.जाडीच्या फायबर ग्लासमध्ये तपशीलाप्रमाणे बांधणी करुन पुरवठा करणे - १ नग रक्कम रुपये.४,८२,०००=०० / प्रति १ नग रिलिंगसह पुरवठा आदेश दिलेला आहे.त्याप्रमाणे दि.२१/०३/२०१७ रोजी महानगरपालिकेस फिरते शौचालय - १ नग प्राप्त झालेले आहे.

सन.२०१६-१७ करिता सुधारित तरतुद व सन.२०१७-१८ करिता अंदाजपत्रकिय तरतूद नविन शौचालय खरेदी या लेखाशिर्षात निरंक दर्शविलेली आहे.

घनकचरा व्यवस्थापन विभाग जा.क्र.८१४ दि.१७/०३/२०१७ चे प्रस्तावान्वये मा.महासभा ठराव क्र.३७ दि.२२/१२/२०१६ अन्वये १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतुन - २ नग फिरते शौचालय खरेंदीस मंजुरी दिलेली आहे.एस.एस.एंटरप्राईजेस,नाशिक यांना दिलेल्या पुरवठा आदेशासह एकूण दोन नग फिरते शौचालय १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतुन खरेदी कार्यवाही करणेबाबत १४ व्या वित्त आयोगाचा प्राप्त निधी (दुसरा हप्ता रु.६.७८ कोटी),आतापर्यंत झालेला खर्च रु.निरंक व उपलब्ध शिल्लक रु.६.७८ कोटी याप्रमाणे माहिती कळविलेली आहे.

सार्व.बांधकाम विभाग जा.क्र.२३४४ दिनांक.२३/०२/२०१७अन्वये ई-निविदा क्र.१३१७ नुसार मा.स्थायी समिती ठराव क्र.७७ दि.१०/०८/२०१६ अन्वये अ.नं.१२७ - F.R.P. Urinal mobile van मॉडेल क्र.GPA-११६ रु.७,१९,२५०/-फक्त प्रति१ नग याप्रमाणे दर मंजूर असल्याबाबत मा.उपआरोग्याधिकारी यांना कळविलेले आहे.त्यांचेकडे समक्ष चौकशी करता यादराने सदर साहित्याची अद्यापपर्यंत खरेदी झालेली नसल्याचे समजते तसेच केंद्रीय भांडार, मुंबई यांचे संदर्भ नं.KB/MUM/QTN/19/SSE/2016-17 दिनांक २०/१२/२०१६ अन्वये

एस.एस.एंटरप्राईजेस,नाशिक यांचेशी दर करार केलेला असून त्यात अ.नं.४ - १० Seater F.R.P.Mobile Toilet Van ६,३०,०००/-प्रति१नग+वॅटटॅक्स+LBT+वाहतुक भाडेयाप्रमाणे दरदि.३१/०३/२०१७अखेर मुदती पर्यंतआहे.पुरवठादार एस.एस.एंटरप्राईजेस,नाशिक यांनी दि.०९/०३/२०१७चे पत्रान्वये रुपये.४,८२,०००/-फक्त प्रति १ नग या मंजूर निविदा दराने पुरवठा करण्यास तयार असल्याबाबत संमती दर्शविलेली आहे.

तरी नव्याने ई-निविदा प्रक्रिया न राबविता ई-निविदा क्र.१०१४ नुसार वार्षिक मंजूर निविदा दराने घनकचरा व्यवस्थापन विभागाचे मागणी प्रस्तावाप्रमाणे १० सीटचे फिरते शौचालय १ नग खरेदी करण्यास व येणा-या खर्चास मा.अतिरिक्त आयुक्त तथा प्र.आयुक्तसाहेब यांनी दि.२६/०७/२०१६ रोजी मंजुरी दिलेली असून त्याचा पुरवठा आदेश कायम ठेवून आणखी एक असे एकूण दोन नग या ई-निविदा क्र.१०१४ नुसार वार्षिक मंजूर निविदा दराने एस.एस. एंटरप्राइजेस, नाशिक यांचेकडून खरेदी करण्यास येणारा खर्च रक्कम रु.९,६४,०००=०० मात्र(अक्षरी रक्कम रुपये.नऊ लक्ष चौसष्ठ हजार मात्रचा)खर्च १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून करण्यास मंजुरी मिळणेस तसेच ई-निविदा क्र.१०१४ करिता केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सविनय सादर करणेबाबत स्टोअर विभाग दि.०१/०४/२०१७ चे प्रस्तावावर -

मा.घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांनी "अ प्रमाणे मंजुरीस्तव सादर"

मा.उपायुक्तसाहेब(कर) यांनी "मुलेप मार्फत सादर करावे"

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी "प्रस्तावित 'अ' नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही"

मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब यांनी "उपरोक्त अहवालामधिल 'अ' प्रमाणे 'मान्य' असे अभिप्राय नमुद करुन स्वाक्षरी केलेली आहे.

संबंधित निविदाकार यांना जा.क्र.स्टोअर विभाग-१७ दि.२९/०४/२०१७ अन्वये निविदा डिपॉझिट रक्कम भरुन करारनामा करुन देणेबाबत कळविले असता त्यांनी दि.२४/०५/२०१७ रोजी निविदा डिपॉझिट रक्कम भरुन संविदा पूर्ण केलेली आहे.

तरी ई-निविदा क्र.१०१४ चे वार्षिक मंजूर निविदा दराने अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतुन फिरते शौचालय - १० सीटचे (५ पुरुष व ५ स्त्री) ट्रॅक्टर ट्रॉली पद्धतीचे निविदा प्रपत्र 'अ' मधील सविस्तर स्पेसिफिकेशन प्रमाणे खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सविनय सादर.

सोबत- निविदा प्रपत्र "अ" मधील फिरते शौचालयाचे सविस्तर स्पेसिफिकेशन

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे

| **अ.क्र.** | **साहित्याचा तपशिल** |
|---|---|
| १ | चारचाकी चासीवर आर.टी.ओ. नियमानुसार १० सीटचे फिरते शौचालय २० मि.मी. जाडीच्या पॅनेलवर १.५ मि.मी. जाडीच्या फायबर ग्लासमध्ये तपशीलाप्रमाणे बांधणी करून पुरवठा करणे सविस्तर तपशील खालील प्रमाणे |
| | **टॉयलेट स्पेसिफिकेशन -**<br>१. टॉयलेट संख्या- १० ( ५+५)<br>२. लांबी -४४०० मि.मी. रूंदी २१०० मि.मी. जमिनीपासून उंची ३२५० मि.मी.<br>३. टॉयलेट साईज- ३' X२'.९"X६'.५"<br>४. शौचालय भांडे- भारतीय पध्दतीचे , फायबर ग्लास रेनफोर्स प्लॅस्टीक पासून बनविलेले परंतू त्याला गंज लागणार नाही असे. |

| | |
|---|---|
| | ५. बांधणी (सांगाडा)- ३५X ३५X३ मि.मी. अँगल - २५X२५X३ मि.मी. चे चॅनेल वापरण्यात यावे.<br>६. पॅनेलींग- फायबर ग्लास रेनफोर्स प्लॅस्टीक चांगल्या प्रतीचे आतुन बाहेरून वापरण्यात यावे.<br>७. दरवाजे- लोखंडी फ्रेम मध्ये फायबर ग्लास रेनफोर्स प्लॅस्टीक पासून बनविलेले ३२ मि.मी. जाडीचे २'X५'.६" |
| | **साईड प्लॅटफॉर्म**<br>१. प्रकार - गाडीच्या दोन्ही बाजूस आतमध्ये सरकणारा लोखंडी प्लॅटफॉर्म असावा.<br>२. साईज- ४४००X ५५८ मि.मी.<br>३. मटेरिअल- आय.एम.एम.सी. ७५X४० चॅनल ४०X५ एम.एस.अँगल , ३०मि.मी. व्यासाचे पाईप १६ गेजचे<br>४. शिडी- दोन्ही बाजूस प्रत्येकी दोन प्रमाणे चार फोल्डेबल शिडया अँगल मध्ये तयार कराव्यात. |
| | **मैला टाकी-**<br>१. क्षमता- १००० लिटर्स<br>२. मटेरिअल - FRP<br>३. फिटींग- टाकीच्या मागील बाजूस ४"इंची बटरफ्लाय व्हॉल्व्ह बसविणे मैलाटाकी साफ करण्यासाठी योग्य सोय करण्यात यावी मैला टाकीत निर्माण होणारा गॅस बाहेर उत्सर्जीत करणेची योग्य व्यवस्था करणेत यावी. |
| | **पाण्याची टाकी -**<br>१. क्षमता - ६५० लिटर्स<br>२. मटेरिअल -FRP<br>३. फिटींग - गाडीच्या समोरील बाजूस सोयीनुसार पुश टाईप पाण्याचे नळ बसवावेत , पाण्याची टाकी साफ करणेसाठी योग्य सोय करण्यात यावी. |
| | **ट्रेलर स्पेसिफिशेन -**<br>१. फिरते टेबल- स्प्रिंग कुशल टाईप टी बार, फुल टर्न होणारे हेवी डयुटी ,आय.एस.एम.सी. १००X५०<br>२. चॅसीज फ्रेम- आय.एस.एम.सी. १२५X ६५<br>३. टायर- संख्या ४ एम.आर.एफ.कं.चे टायर , टयुब व प्लॅपसह<br>४. साईज- ७.५० X १६.१६ फ्लाय<br>५. ॲक्सल- संख्या २<br>६. मेटरिअल - ७५X७५स्क्वेअर ने बनविलेले असावे.<br>७. हब- संख्या ४<br>८. मटेरिअल- कास्ट स्टील<br>९. चाके- संख्या ४<br>१०. साईज- ५.५० X १६<br>११. बेअरिंग- संख्या ८<br>१२. प्रकार- टेपर रोलर<br>१३. ब्रेक- पार्कींग व सर्व्हिस प्रकारचे इंटर्नल एक्सपोंडींग शु ब्रेक<br>१४. सस्पेंशिन -सेमिइलेप्टिकल, लिफ स्प्रिंग (४ चाकावर) |
| | **पेंट-**<br>१. संपुर्ण गाडीस स्काय ब्ल्यु रंगाचे न गंजनारे, झिंक बेस प्रायमर चे दोन थर देण्यात यावे. तसेच त्यावर फिरते शौचालय - आरोग्य विभाग, अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर असे लेटरींग दोन्ही बाजूंनी करून द्यावे व पुरूष व स्त्रियांकरिता असे दर्शविणारे चित्र काढावीत.<br>२. दोन्ही टाक्यांना आतील बाजूने इपोक्सी पेंटचे थर द्यावेत. |

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतुन फिरते शौचालय -१० सीटचे (५ पुरूष व ५ स्त्री) ट्रॅक्टर ट्रॉली पध्दतीचे -२ नग खरेदी करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती बाबत प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.सुनिता फुलसौंदर :- बुरूडगांव रोड,समर्थ नगर येथील पाण्याची टाकी बांधून जवळपास १० वर्ष झाली आहेत.त्यामध्ये पाणी नाही.सदरची टाकी अदयापर्यत सुरू करण्यात आलेली नाही.सारसनगर येथे रोज पाण्याची किती टॅकर चालू आहेत.या टॅकरचा रोजचा खर्च कीती, व वार्षीक खर्च कीती याचा खुलासा करावा.

मा.सभापती साहेब :- संबंधीत अधिका-यांनी माहिती दयावी.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- सारसनगर येथे रोज ४ टॅकर चालू आहेत.एका टॅकर करीत ३ रू.रोज आहे.रोजचा खर्च १२ हजार रूपये आहे.

मा.सौ.सुनिता फुलसौंदर :- जर पाण्याच्या टाकीचे काम पुर्ण झाले तर हा रोज रू.१२ हजार रोजचा खर्च वाचणार आहे.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- टाकीचे काम पुर्ण झालेले आहे.इनलेट,आउट लेट जोडले आहेत.टाकीचे काम पुर्ण होवून ७ ते ८ वर्ष झालेले आहे.अदयाप पर्यत टाकी मध्ये पाणी सोडले नाही.

मा.आयुक्त साहेब :- टाकीचे काम पुर्ण होवून ७ ते ८ सुध्दा टाकीचा आपण उपयोग करीत नाही.काय कारण आहे .अडचणी काय आहेत.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- ठेकेदाराने उर्वरित काम दोन महिन्यांमध्ये पुर्ण करणार होते,परंतु अदयाप काम पुर्ण झालेले नाही.

मा.सौ.सुनिता फुलसोंदर :- का पुर्ण केले नाही ते सांगा.

मा.सभापती साहेब :- पाण्याच्या टाकीचे काम पुर्ण झाले तर रू.१ कोटी रूपये वाचनार आहेत.

प्र.शहर अभियंता श्री.सोनटक्के :- ठेकेदाराचे बील थकीत आहे. टाकी पाईल पाईनला जोडलेली नही.टाकी मध्ये पाणी भरल्यानंतर टेस्टींग घेणे आवश्यक आहे.

मा.सौ.सुनिता फुलसोंदर :- जोडली का नाही ते सांगा.

मा.आयुक्त साहेब :- पाणी पुरवठा विभाग आपल्याकडील माहीती सांगा.

मेकॅनिकल इंजी.पा.पु.विभाग श्री.निकम :- समर्थ नगर पाण्याची टाकी ही मुळ प्राजेक्ट फेज -२ मध्ये घेतला होता.प्रोजेक्ट प्रमाणे ही फक्त टाकी उभारण्यात आली होती.तत्कालीन बांधकाम विभागामार्फत उभारण्यात आली होती,त्यात पाणी पुरवठा विभागाचा काहीही संबंध नव्हता,त्यांनी उभारतांना टाकी आणी त्याखाली संप आणि पंप उभारणे गरजेचे होते.अंदाजपत्रकामध्ये फक्त टाकी धरली गेली संप आणि पंप अंदाजपत्रका मध्ये नसल्याने उभारले गेले नाही.त्यामुळे त्यावेळेसच्या परिस्थीतीत त्या संप पर्यत टाकी पर्यत पाणी नेता आले नाही.हे करत असतांना टाकीचे काम अर्धवट अवस्थेत ठेवले होते.महानगरपालिकेने ठेकेदाराला वेळोवेळी नोटीस दिल्या आहेत.मा.पदाधिका-यांच्या बैठकीमध्ये सुध्दा सुचना वेळोवेळी देण्यात आल्या आहेत.कामकरण्यास सांगीतले आहे.परंतु काम केलेले नाही.नंतर त्या काळात ही टाकी शहर सुधारीत पाणीपुरवठा फेज -२ अंतर्गत त्याचे वेगळे डिझाईन केले ही टाकी पुर्ण करून एम्प्रीयल चौक येथुन लाईन जोडून टाकी पर्यत आणून ठेवली आहे.मा.आयुक्त साहेब व मा.महापौर साहेब,मा.सभापती साहेब आम्ही सर्वानी व्हिजीट देवून उर्वरित काम करण्यास

सांगीतले होते.त्यानंतर ठेकेदाराने काम करण्यास सुरूवात केली असून इन लेटआउटलेट चे पाईप मिळत नव्हते.ते पाईप आता मिळाले असून ते टाकण्यात आले आहेत.ते पाईप टाकल्यानंतर टाकीच्या आतील कॉक्रीट निघाले होते.ते कॉक्रीट करण्यास सांगीतले आहे.या आठवडया भरात काम होईल असे सांगीतले आहे.कॉक्रीट चे काम झाल्यानंतर ट्रॅयल घेवून फेटू ची लाईन आहे त्या अंतर्गत टाकीची ट्रयल घेण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- किती दिवसात काम पुर्ण होईल.

मा.आयुक्त साहेब :- लवकरात लवकर काम पुर्ण करा.

मा.सौ.सुनिती फुलसौंदर :- दिवाळी पर्यत काम पुर्ण होईल का?

मेकॅनिकल इंजी.पा.पु.विभाग श्री.निकम :- ठेकेदाराने रिस्पॅन्स दिला तर काम पुर्ण होईल.

मा.सभापती साहेब :- ठेकेदाराकडून काम होत नसल्यास ठेकेदार बदला.

मेकॅनिकल इंजी.पा.पु.विभाग श्री.निकम :- या स्टेजला आपल्याला ठेकेदार बदलता येणार नाही.जवळपास ९५ टक्के काम झालेले आहे.५ टक्यासाठी बदलणे योग्य ठरणार नाही.टाकीचे डीझाईन सुध्दा ठेकेदाराकडे असते.त्यामुळे दुसार ठेकेदार काम करणार नाही.

मा.बाळासाहेब बोराटे :- या टाकीचा फायदा कोणत्या भागात होणार आहे.

मेकॅनिकल इंजी.पा.पु.विभाग श्री.निकम :- समर्थ नगर,सारस नगर,पोकळे मळा,बुरूडगांव रोड या संपूर्ण भागा करीता या टाकीचे नियोजन आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- जर टाकीचे काम पुर्ण झाल्यास दररोज २० ते २५ हजार रूपये रोज वाचणार आहे.१० वर्षा पासुन चालू आहे.इतक्या दिवसांमध्ये ठेकेदारावर कारवाई झाली पाहिजे होती.वर्कऑर्डरची मुदत सर्व काही संपलेले आहे.

मा.सभापती साहेब :- ठेकेदाराला शेवटची नोटीस देवून कालावधी दया,अन्यथा त्याच्यावर कारवाई प्रस्तावित करा.

मा.सौ सुनिता भिंगारदिवे :- आमच्या भागामध्ये लाईट नाहि,माझ्या दारातील दिवे सुध्दा बंद आहेत.

इले विभाग प्रमुख श्री.सातपुते :- मटेरियल शिल्लक नाही,लवकरच मटेरियल येणार आहे.आल्यानंतर लावण्यात येईल.

मा.श्री.दिलीप सातपुते :- आपल्याला माहित असते मटेरियल संपणार आहे.आपण आधिच का ऑर्डर देवून मटेरियल मागवून घेत.

इले विभाग प्रमुख श्री.सातपुते :- तीन महिन्यापुर्वी मागणी केली होती.सप्लायरचे बील थकले आहे.त्यांना वेळोवेळी पत्रव्यवहार केला आहे.थोडेफार पेमेंट दिल्यावर त्यांनी मटेरियल पाठविले आहे.मटेरियल आपल्याला आवश्यक्ता आहे सात लाखांची सध्या त्यांनी ५० टक्के मटेरियल पाठविले आहे.शहरातील काम आज संपत आले आहे.

मा.आयुक्त साहेब :- श्री.सातपुते व श्री.झिरपे आपण बसून या बाबत निर्णय घ्या.

मा.सभापती साहेब :- जर सर्ववॉर्ड मधील तक्रारी आहेत.तर मटेरियल नाही तर मटेरियल जाते कोठे.

इले विभाग प्रमुख श्री.सातपुते :- संपुर्ण शहरामध्ये ३३ हजार दिवे आहेत,१० टक्के जरी बंद पडले तरी ३ हजार ३०० दिवे जातात. आपल्याला मिळतात आठराशे ते दोन हजार मागणी जास्त आहे.मटेरीयल आपल्याला निम्मेच मिळते.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- आमची एक विनंती आहे,इलेक्ट्रीक मटेरीलय इले विभागा नगरसेवका कडे देतात.स्वत: पालीकेच्या वायरमन ने दिवे बसविले पाहिजे.मटेरियल जाते कोठे?

मा.आयुक्त साहेब :- काय सिस्टम आहे आपल्या कडे.

इले विभाग प्रमुख श्री.सातपुते :- आपण स्टोअर विभागा कडून मटेरियल जमा करतो,सुपरवाझर साळवे व क्षेत्र यांचे कडे वायरमन सांगतात.ते मटेरियल देवून गेट पास देतात,

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- पूर्वी नगरपालिकेत अशी सिस्टम होती,टयुबवर लाल कलर मध्ये ए एम सी लीहीत होतो.ते आपण का बंद केले? त्या मुळे पुर्वी चो-या होत नव्हत्या त्याला कारण होते.टयुबर व चोक वर ए एम सी लीहायचो त्यावर नंबर टाकायचे,टयुब बदल्याची तारीख लीहायचे,ती सिस्टीम का बंद केली? पुर्वी ची सिस्टीम चालू करा.सर्व काही मटेरियल मिळत नाही म्हणून बोंब नाही,चो-या सुध्दा होतात.पुर्वी मटेरिल उरत होते.भरपुर मटेरियल पडलेले असायचे.

इले विभाग प्रमुख श्री.सातपुते :- हि सिस्टीम मी येण्या पुर्वी पासुन बंद झालेली आहे.वायरमन म्हणतात आमच्या कडून एवढे काम होत नाही.

मा.सभापती साहेब :- या पुर्वी होत होते आता का होत नाही.

मा.बाळासाहेब बोराटे :- टोलवाटोलवीची उत्तरे देवू नका.चांगला उपक्रम बंद करायचा.

इले विभाग प्रमुख श्री.सातपुते :- ही सिस्टीम पुन्हा चालू करण्यात येईल.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- संविदेची माहिती निदर्शनास आली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- संविदेची माहिती निदर्शनास आली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतुन फिरते शौचालय -१० सीटचे (५ पुरूष व ५ स्त्री) ट्रॅक्टर ट्रॉली पध्दतीचे -२ नग खरेदी करणेबाबत खरेदी करणेसाठी केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये केलेल्या संविदेची माहिती स्थायी समितीच्या निदर्शनास आली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतुन फिरते शौचालय -१० सीटचे (५ पुरूष व ५ स्त्री) ट्रॅक्टर ट्रॉली पध्दतीचे -२ नग खरेदी करणेबाबत खरेदी करणेसाठी केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये केलेल्या संविदेची माहिती स्थायी समितीच्या निदर्शनास आली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ३९ सोमवार दि.२८/०८/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका विविध विभागा कडील जुने निरूपयोगी भंगार साहित्य गअ क्र.३ ते ५ मध्ये नमुद प्रमाणे विक्री करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका ७३(ड) अन्वये माहिती बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजूकर :-** अहमदनगर महानगरपालिका स्टोअर विभाग

**संदर्भ :-** ई-निविदा क्र.१५०७

उपरोक्त विषयास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,सदर नस्तीमधील टी-२३ ते टी-२७ प्रमाणे स्टोअर विभाग दि.२३/०२/२०१७ चे प्रस्तावात नमुद गट क्र.३ ते ५ चे जुने निरुपयोगी भंगार साहित्य विक्री करणेकामी मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांकःमातसं/नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई - ४०००३२ दि.६ ऑगस्ट २०१० अन्वये ई-निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करुन **http://amc.maharashtra.etenders.in** या वेबसाईटवर,अ.नगर मनपाचे अधिकृत संकेतस्थळावर तसेच मनपा नोटीस बोर्डवर जाहिर टेंडर नोटीस प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता मुदतीत -

१)बालाजी स्क्रॅप मर्चंट,अहमदनगर
२)इम्तीयाज अजीज शेख,अहमदनगर
३)एम.जे.मल्टी सर्व्हिसेस(स्क्रॅप),अहमदनगर
४)श्री.सुभाष व्यंकटेश वल्लाकट्टी,अहमदनगर

याप्रमाणे चार (४) निविदा प्राप्त झालेल्या असून निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता गट क्र.३ मधिल अ.क्र.१ ते ८७ चे जुने निरुपयोगी साहित्य खरेदीकामी रक्कम रुपये.२,०१,०००=००फक्त हि किंमत शेख इम्तियाज अजीज,अहमदनगर यांची सर्वात अधिकतम प्राप्त झालेली असून सदरची किंमत कार्यालयीन किंमतीपेक्षा रक्कम रुपये.२८,०६७=००फक्तने अधिक आहे.

गट क्र.४ व ५ मधिल अनुक्रमे अ.क्र.१ ते १० व १ ते ४८ चे जुने निरुपयोगी भंगार साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेली अनुक्रमे रक्कम रुपये.३,८०,४२२=०० व रुपये.७०,१११=०० हि किंमत बालाजी स्क्रॅप मर्चंट,अहमदनगर यांची सर्वात अधिकतम प्राप्त झालेली असून सदरची किंमत ऑफिस किंमतीपेक्षा अनुक्रमे रक्कम रुपये.२२,५३८=०० व रुपये.१७,१३४=००फक्तने कमी आहे.

दि.१८/०४/२०१७ रोजी मा.प्रशासकिय खरेदी समिती बैठकीमध्ये निविदा दर निगोसिएशन करिता उपस्थित राहणेबाबत शेख इम्तीयाज अजीज,अहमदनगर व बालाजी स्क्रॅप मर्चंट,अहमदनगर यांना कळवून निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यासह संपूर्ण प्रकरण निर्णयास्तव तथा अवलोकनार्थ मा.प्रशासकिय खरेदी समिती समोर सादर केले असता इम्तीयाज अजीज शेख,अहमदनगर व बालाजी स्क्रॅप मर्चंट,अहमदनगर हे समक्ष उपस्थित राहुन त्यांनी दर वाटाघाटीबाबत बैठकीत झालेल्या चर्चेनुसार खालील प्रमाणे दर वाढ करुन येणा-या दराने सदरचे निरुपयोगी भंगार साहित्य खरेदी करण्याचे मान्य केलेले असून तसे लेखी संमती पत्र दिलेले आहे.

## निविदाकार - इम्तीयाज अजीज शेख,अहमदनगर

| गट नं. | जुने निरुपयोगी भंगार साहित्याचा संक्षिप्त तपशील | अधिकतम निवि दर रक्कम रुपये. | निगोसिएशन नंतर मान्य केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| ३ | रक्तपेढी विभाग,कै.बा.दे.दवाखाना, घनकचरा व्यवस्थापन विभाग व क्रिडा विभागाकडील जुने निरुपयोगी भंगार साहित्य अ.क्र.१ ते ८७ | २,०१,०००=०० | २,०१,७८६=०० |

## निविदाकार - बालाजी स्क्रॅप मर्चेन्ट ,अहमदनगर

| गट नं. | जुने निरुपयोगी भंगार साहित्याचा संक्षिप्त तपशील | अधिकतम निविदा दर रक्कम रुपये. | निगोसिएशन नंतर मान्य केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| ४ | अनाधिकृत बांधकाम नियंत्रण व अतिक्रमण निर्मुलन विभाग व मोटर व्हेईकल विभागाकडील जुने निरुपयोगी भंगार साहित्य अ.क्र.१ ते १० | ३,८०,४२२=०० | ४,०५,०००=०० |
| ५ | अहमदनगर महानगरपालिका विविध विभागा कडील जुने निरुपयोगी संगणक,इलेक्ट्रिक व फर्निचर साहित्य अ.क्र.१ ते ४८ | ७०,१११=०० | ९१,०००=०० |

तसेच मनपा सर्व विभागांनी त्यांचेकडील जुने निरुपयोगी भंगार साहित्य विक्रीनंतर विक्री केलेल्या सर्व साहित्याच्या त्यांचे विभागाकडील जंगम मालमत्तेची नोंदवही नमुना नं.११४ मधील नोंदी निर्लेखित करण्यास व तसे संबंधित विभागास आदेशीत करण्यास मा.प्रशासकिय खरेदी समितीमार्फत शिफारस करण्यात आलेली आहे.

मा.प्रशासकिय खरेदी समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे गट क्र.३ ते ५ चे जुने निरुपयोगी भंगार साहित्य खरेदीकामी दर निगोसिएशन नंतर मान्य केलेल्या उपरोक्त नमुद किंमती कार्यालयीन किंमतीपेक्षा जास्त असल्याने सदरच्या किंमती रक्कमा संबंधिताकडून वसुल करुन जुने निरुपयोगी भंगार साहित्य त्यांना विक्री करणेस,मनपा सर्व संबंधित विभागांनी त्यांचेकडील जुने निरुपयोगी भंगार साहित्य विक्रीनंतर विक्री केलेल्या सर्व साहित्याच्या त्यांचे विभागाकडील जंगम मालमत्तेची नोंदवही नमुना नं.११४ मधील नोंदी निर्लेखित करण्यास व तसे संबंधित विभागास आदेश निर्गमित करणेस तसेच केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करणेस मंजुरी मिळणेबाबत दि.२०/०४/२०१७ रोजीच्या प्रस्तावावर -

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी "स्टोअर विभाग प्रमुख यांचे अभिप्रायानुसार 'अ' प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही व पुष्ठ क्र.१ ते ६ मध्ये दाखविलेले साहित्य भंगार आहे किंवा कसे चा अधिन राहून नियमाप्रमाणे करारनामा करावा निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे मंजुरीस"

मा.उपायुक्तसाहेब(कर)यांनी "प्रस्तावित नूसार मान्यतेस हरकत नाही"

मा.अतिरिक्त आयुक्तसाहेब यांनी " उपायुक्त(कर) 'अ' व 'ब' प्रमाणे मा.आयुक्तसाहेब यांचे कडील दुरुस्त आदेश जा.नं.साप्रवि-४०० दि.०९/०८/२०१६ अन्वये आपले स्तरावरुन कार्यवाही करावी" असा अभिप्राय नमुद करुन स्वाक्षरी केलेली आहे.

मा.उपायुक्त(कर) यांनी "प्रस्तावितनूसार मा.अति.आयुक्त यांचे अभिप्रायानूसार मान्य"असा अभिप्राय नमुद करुन स्वाक्षरी केलेली आहे.

संबंधित निविदाकार यांना जा.क्र.स्टोअर विभाग - २४ व २५ दि.०५/०५/२०१७ अन्वये निविदा डिपॉझिट रक्कम भरुन करारनामा करुन देणेबाबत कळविले असता त्यांनी दि.०३/०५/२०१७ रोजी निविदा डिपॉझिट रक्कम भरुन संविदा पूर्ण केलेली आहे.

तरी ई-निविदा क्र.१५०७ मधिल गट क्र.३ ते ५ चे जुने निरुपयोगी भंगार साहित्य विक्री करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड)अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सविनय सादर.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**--**--**

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका विविध विभागा कडील जुने निरूपयोगी भंगार साहित्य गअ क्र.३ ते ५ मध्ये नमुद प्रमाणे विक्री करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका ७३(ड) अन्वये माहिती बाबत ऑफिस रिपोर्ट.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- सभेमध्ये सेक्रेटरी,जयहिंद महिला मंचाच्या बचत गटांकरीता देशमुखवाडी,गोगादेव मंदिर मागे ,सर्जेपुर अहमदनगर येथील जागा दिर्घ भाडेतत्वावर/कायम मालकी तत्वावर मिळणेबाबत अर्ज व सौ.जयश्री बाळासाहेब सोनवणे, नगरसेविका,अहमदनगर महानगरपालिका यांनी स्थायी समितीस जागा देणे बाबत वरील संस्थेस जागा देणे बाबत विनंती यादी दिली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- संविदेची माहिती निदर्शनास आली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा व सभेमधील प्राप्त अर्जानुसार जयहिंद महिला मंच ही एक सामाजीक संस्था असून,संस्थेच्या माध्यमातुन ५०० पेक्षा जास्त बचत गटांची स्थापना करण्यात आली आहे व त्या मार्फत सुमारे ५००० महिलांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.महिलांच्या सबलीकारणा करीता महानगरपालिकेच्या मालकीच्या सर्व्हे नं.२६९/७३,देशमुखवाडी,सर्जेपुरा येथील गोगादेव मंदिर मागील जागा करारानुसार भाडेतत्वावर दिल्यास महानगरपालिकेस उत्पन्नाबरोबर सामाजिक उपक्रमाकरीता प्रात्साहन मिळेल.सदर उपक्रमाकरीता अर्जदार जयहिंद महिला मंच यांना नियमानुसार जागा देण्यात याची.

मा.श्री.मुदस्सर शेख :- प्रस्तावातील ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.जयहिंद महिला मंच ही एक चांगली सामाजीक संस्था असून महिलांच्या रोजगारा कारीता कार्यरत आहे.या संस्थेस उत्पादन खेरेदी व विक्री केंद्र सुरू करण्यासाठी महानगरपालिकेच्या मालकीच्या सर्व्हे नं.२६९/७३,देशमुखवाडी,सर्जेपुरा येथील गोगादेव मंदिर मागील जागा नियमानुसार कराराने भाडेतत्वावर देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका विविध विभागा कडील जुने निरूपयोगी भंगार साहित्य गअ क्र.३ ते ५ मध्ये नमुद प्रमाणे विक्री करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये केलेल्या संविदेची माहिती स्थायी समितीच्या निदर्शनास आली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार जयहिंद महिला मंच ही एक सामाजीक संस्था आहे.संस्थेच्या माध्यमातुन महिलांकरीता विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जात असल्याने समाजातील सर्व स्तरातील महिलांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.महिलांच्या सबलीकारणा करीता नवनवीन कार्य व उदयोग तसेच बचतगटाच्या माध्यमातून उत्पादन खेरेदी व विक्री

केंद्र सुरू करण्यासाठी महानगरपालिकेच्या मालकीच्या सर्व्हे नं.२६९/७३,देशमुखवाडी,सर्जेपुरा येथील गोगादेव मंदिर मागील जागा ७ वर्ष कराराने भाडेतत्वावर देण्यात यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका विविध विभागा कडील जुने निरूपयोगी भंगार साहित्य गअ क्र.३ ते ५ मध्ये नमुद प्रमाणे विक्री करणेबाबत केलेल्या संविदेची माहिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये केलेल्या संविदेची माहिती स्थायी समितीच्या निदर्शनास आली आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार जयहिंद महिला मंच ही एक सामाजीक संस्था आहे.संस्थेच्या माध्यमातुन महिलांकरीता विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जात असल्याने समाजातील सर्व स्तरातील महिलांना रोजगार उपलब्ध झालेला आहे.महिलांच्या सबलीकारणा करीता नवनवीन कार्य व उदयोग तसेच बचतगटाच्या माध्यमातून उत्पादन खेरेदी व विक्री केंद्र सुरू करण्यासाठी महानगरपालिकेच्या मालकीच्या सर्व्हे नं.२६९/७३,देशमुखवाडी,सर्जेपुरा येथील गोगादेव मंदिर मागील जागा ७ वर्ष कराराने भाडेतत्वावर देण्यात यावी. याकामी क्षेत्र निश्चिती करावी व करारनामा,अटी/ शर्ती ,अनामत रक्कम,दरमहा जागा भाडे इ.या बाबत पुढील कार्यवाही संबंधीत विभागांनी करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ४०                                                                                      सोमवार दि.२८/०८/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** मालमत्ता धारक श्री.गांधी सुरेशलाल मोहनलाल प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२३ मार्केडेय मार्ग स्टेशन रोड,यांना बील क्र.४२८ व ४३६ ही एकच मालमत्ता असून एका मालमत्तेचे दुबार बिल येत असल्याने ओपन प्लॉट वरील बील क्र.४२८ वरील रू.३४८१७/- निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजूकर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ बुरूडगाव रोड

रिपोर्ट देण्यांत येतो की, श्री. गांधी सुरेशलाल मोहनलाल मार्कडेय मार्ग स्टेशन रोड,अ. नगर यांनी इकडेस दि.१७/२/२०१६ रोजी अर्ज देउन कळविले की, त्यांची मार्कडेंय मार्ग स्टेशन रोड येथे मिळकत असुन सदर मिळकतीचे दोन बीले येतात. तरी समक्ष पहाणी करून प्रत्यक्षात जागेवर जी मिळकत आहे त्याची एकच बिल द्यावे याप्रमाणे अर्ज दिलेला आहे.

श्री. गांधी सुरेशलाल मोहनलाल यांच्या मिळकतीची नोंद वॉर्ड नं.२३ बिल नं.४२८ व ४३६ असे एकाच मालमत्तेचे दोन बीले येतात. पुर्वी बिल क्र.४२८ हा ओपन प्लॉट होता. सदर आपेन प्लॉटवर सन २००१ मध्ये बांधकाम झालेले आहे. तत्कालीन वॉर्ड लिपिक यांनी सदर बांधकामाची आकारणी केली. सदर आकारणी बिल नं.४२८ वर करणे आवश्यक होते. परंतु वसुली लिपिक यांनी सदर बांधकामाची आकारणी नोंद बिल नं.४३६ वर घेतली अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर जागेची कर निरीक्षक समवेत समक्ष पहाणी केली असता सदर मिळकत एकच असल्याचे आढळले.

सबब अर्जदाराचे अर्जानुसार वरील दोन्ही बिलाचे मिळकतीची नोंदपैकी बिल नं.४२८ वरील ओपन प्लॉटची नोंद रद्द होणेस तसेच सन २०१५-२०१६ अखेर ओपन प्लॉटची थकबाकी रक्कम रू.१९१०२/- व शास्ती रू.१५७१५/- अशी एकुण ३४८१७/- इतकी रककम वसुल न होणारी असल्यामुळे महाराष्ट्र मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १५२ अन्वये कायमस्वरूपी निर्लेखित करणेस्तव रिपोर्ट मा. स्थायी समिती समोर निर्णयासाठी आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे वसुल क्लार्क , कर निरीक्षक यांचा रिपोर्ट असे

यावर प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की, रिव्हीजन विभाग पुढील कार्यवाहीस्तव

यावर रिव्हीजन विभाग यांचा अभिप्राय की, सादर, कर निरीक्षक यांचे प्रस्तावानुसार सदर मालमत्ता एकच असुन त्यांना एक ओपन प्लॉट व एक निवासी क्षेत्राचे बिल जात आहे. २००१ मध्ये ओपन प्लॉटवर बांधकाम झालेले आहे. त्यामुळे बिल नं.४२८ वरील थकबाकी ही वसुल न होणारी असल्याने कलम १५२ नुसार मा. स्थायी समिती कडे पासुन निर्लेखित करण्यास मान्यतेस सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, पाहणी अहवाल सक्षम प्राधिकारणांच्या स्वाक्षरीने सादर करा.

यावर उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर वसुली लिपिक यांचा अभिप्राय की, फेरसादर प्रस्तुत प्रकरणी मा.मु.ले.प. यांनी दि.२/१/२०१७ रोजी आदेशीत केलेप्रमाणे पाहणी अहवाल स्वाक्षरीने सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, फेरसादर प्रस्तावान्वये पूर्तता केली असल्याने मूळ प्रस्तावीतनुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावीतनुसार नियमाप्रमाणे मान्य

यावर मा.अति. आयुक्त यांचा अभिप्राय की, सोबतच्या फेरसादर अहवालनुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

संदर्भ :- मालमत्ता धारक यांचा दि.१७/२/२०१६ रोजीचा अर्ज

प्रभाग समिती क्र.४ प्रभाग अधिकारी यांजकडून विनंती प्रस्ताव देण्यात येतो की, वॉर्ड नं.२३ मार्केडेय मार्ग स्टेशन रोड, अ. नगर मालमत्ता धारक गांधी सुरेशलाल मोहनलाल यांचे पुर्वीचे बिल नं.४२८ ओपन प्लॉट होता. सन २००१ मध्ये नवीन बांधकाम करण्यात आले सदरची नोंद बील नं.४२८ वर घेणे क्रमप्राप्त असतांना सदर नवीन नोंद बिल नं.४३६ वर घेण्यात आलेने एकाच मिळकतीचे दुबार नेंद झालेने बिल नं.४२८ वरील ओपन प्लॉट नोंद रद्द करणेकामी याबाबत संबंधीतास मिळकतीची दि.१७/५/२०१७ व १६/२/२०१६ रोजीचे समक्ष पहाणी अहवाल सोबत जोडण्यात आलेले आहेत. तथापी बिल नं.४२८ ओपन प्लॉट थकबाकी रू.३४८१७/- रक्कम निर्लेखित करण्यास मा. स्थायी समिती कडे निर्णयास्तव सादर.

येणेप्रमाणे प्रभाग अधिकारी क्र.४ यांचा रिपोर्ट असे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभेपुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा. सभापती साहेब :- मालमत्ता धारक श्री.गांधी सुरेशलाल मोहनलाल प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२३ मार्केडेय मार्ग स्टेशन रोड,यांना बील क्र.४२८ व ४३६ ही एकच मालमत्ता असून एका मालमत्तेचे दुबार बिल येत असल्याने ओपन प्लॉट वरील बील क्र.४२८ वरील रू.३४८१७/- निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दत्ता कावरे :- मालमत्ता धारक गांधी सुरेशलाल मोहनलाल यांचे ओपन प्लॉट वरील बील क्र.४२८ वरील रू.३४८१७/- निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट मान्य करण्यात यावा

मा.सभापती साहेब :- मालमत्ता धारक श्री.गांधी सुरेशलाल मोहनलाल प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२३ मार्केडेय मार्ग स्टेशन रोड,यांना बील क्र.४२८ व ४३६ ही एकच मालमत्ता असून एका मालमत्तेचे दुबार बिल येत असल्याने ओपन प्लॉट वरील बील क्र.४२८ वरील रू.३४८१७/- निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :-** मालमत्ता धारक श्री.गांधी सुरेशलाल मोहनलाल प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२३ मार्केडेय मार्ग स्टेशन रोड,यांना बील क्र.४२८ व ४३६ ही एकच मालमत्ता असून एका मालमत्तेचे दुबार बिल येत असल्याने ओपन प्लॉट वरील बील क्र.४२८ वरील रू.३४८१७/- निर्लेखित करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात येत आहे.नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.दत्तात्रय कावरे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४

विषय क्रमांक- ४१ सोमवार दि.२८/०८/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अर्जदार श्री.दिनेश पोपटलाल कटारीया यांनी गंजबाजार भाजीमार्केट मधील गाळा क्र.१३६ नांवावर हस्तांतर होणेबाबत दरमहा भाडे , अनामत रक्कम व हस्तांतरण फी रक्कम भरून घेउन कराराने देणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजूकर :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग

विनंतीपुर्वक रिपोर्ट देण्यांत येतो की, अर्जदार श्री. दिनेश पोपटलाल कटारीया यांनी गंजबाजार भाजी मार्केट मधील गाळा क्र.१३६ नांवावर हस्तांतर होणेबाबत अर्ज केलेला आहे.

अर्जदार यांना मा.दुय्यम निबंधक , अ. नगर यांचे समक्ष केलेले संमतीपत्र, हस्तांतर पत्र देणेबाबत जा.क्र. / मार्केट /११२ दि.५/६/२०१५ अन्वये कळविले होते. त्यांनी दि.१/७/२०१५ रोजी इकडेस दिलेले आहे. कर निरीक्षक प्र.स.क्र. २ यांना गाळा नं.१३६ वर घरपटटी पोटी किती थकबाकी आहे. याबाबत माहिती देणेस जा.क्र./मार्केट /१४६ दि.७/७/१५ अन्वये कळविले होते. त्यांनी श्री. पांडुरंग सहादू गुंजाह यांचे नावांची नोंद आढळून येत नाही असे दि.२२/७/२०१५ अन्वये कळविले आहे. गाळा क्र. १३६ चे गाळेधारक यांना जा.क्र./मार्केट /३३६ दि.१६/१/२०५ अन्वये गाळयात परस्पर फेरबदल केलेले म्हणून दंड रूपये २०,०००/- करणेबाबत नोटीस दिलेली आहे. अद्यापपर्यत दंडाची रक्कम भरलेली नाही./अ

मा.नगररचनाकार यांनी जा.क्र./टी.पी./४२३० दिनांक २५/५/२०१५ अन्वये गंजबाजार भाजी मार्केट प्रति चौ.मी. करीता रू.३८०/- इतके दरमहा भाडे व प्रति चौ.मी. करीता रू. १८,९९२/- इतके दर प्रमाणीत करून दिलेले आहे. सदर गाळयांचे क्षेत्रफळ १६ चौ.मी. इतके आहे.

मा.नगररचनाकार यांचे पत्राप्रमाणे रू.३८०/- X १६ चौ.मी. = ६०८०/- रू. इतके नवीन दरमहा भाडे व रू.१८,९९२/- X १६ चौ.मी. = ३,०३,७८२/- रू. इतकी अनामत रक्कम होत आहे.तसेच हस्तांतरण फी रू. ६०,०००/- भरणे आवश्यक आहे.

मा. महासभा ठराव क्र.२० दि.३१/८/२०१५ अन्वये गाळे हस्तांतरणाबाबत प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे घेणेबाबत ठराव मंजूर झालेला आहे.

तरी अर्जदार यांचेकडून दंडाची रक्कम रू.२०,०००/- अनामत रक्कम रूपये ३,०३,८७२/- व हस्तांतरण फी रू.६०,०००/- भरून घेउन ११(अकरा) वर्ष कराराने देणेबाबत प्रस्ताव मा. स्थायी समिती पुढे घेणेबाबत आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा रिपोर्ट असे

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावीत "अ" नुसार मान्यतेस हरकत नाही. मे. स्थायी समिती विषय घेणेसाठी आदेशार्थ सादर.

यावर मा. अति. आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" नुसार पुर्तता करावी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

## चर्चा :-

मा.सभापती साहेब :- अर्जदार यांनी गंजबाजार भाजीमार्केट मधील गाळा क्र.१३६ नांवावर हस्तांतर होणेबाबत दरमहा भाडे , अनामत रक्कम व हस्तांतरण फी रक्कम भरून घेउन कराराने देणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- मा. महासभेच्या ठरावानुसार हस्तांतरण होणार का ?

मार्केट प्रमुख श्री. भोसले :- होय. महासभा ठराव क्र.२० दिनांक ३०/८/२०१५ अन्वये गाळा हस्तांतरणाबाबत प्रक्रिया करण्यात आली.

मा.श्री. दिलीप सातपुते :- हस्तांतरणाबाबतचे रेट कोणते घेतले.

मार्केट प्रमुख श्री. भोसले :- चालू रेडीरेकनरच्या दरानुसार दंडाची रक्कम रूपये २० हजार अनामत ३,०३,८७२/- व हस्तांतरण फी रक्कम ६० हजार आकारण्यात येवुन ११ वर्षे करिता देणेबाबतचा प्रस्ताव आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.दिलीप सातपुते :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार श्री.दिनेश पोपटलाल कटारीया यांनी गंजबाजार भाजीमार्केट मधील गाळा क्र.१३६ हा ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार अर्जदार श्री.दिनेश पोपटलाल कटारीया यांनी अहमदनगर महानगरपालिकेचे गंजबाजार भाजीमार्केट मधील गाळा क्र.१३६ नांवावर हस्तांतर होणेबाबतचा. मा. महासभा ठराव क्र.२० दि.३१/८/२०१५ अन्वये गाळे हस्तांतरणाबाबत मार्केट प्रति चौ.मी. करीता रू.३८०/- X १६ चौ.मी. = ६०८०/- रू. इतके नवीन दरमहा भाडे व रू.१८,९९२/- X १६ चौ.मी. = ३,०३,७८२/- रू.अनामत रक्कम होत आहे.

त्यानुसार हस्तांतरण फी रू. ६०,०००/-,दंडाची रक्कम रू.२०,०००/- अनामत रक्कम रूपये ३,०३,८७२/- भरून घेउन ११(अकरा) वर्ष कराराने देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.
नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.दिलीप सातपुते सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०४**

विषय क्रमांक- ४२ सोमवार दि.२८/०८/२०१७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका यांच्या मंजुरीने सावेडी जुने बसस्थानक बिल क्रमांक ७८९ वर आकारणी करण्यात आलेली घरपट्टीची रक्कम रूपये ५३,२६,५२१/- शास्तीसह रक्कम निर्लेखित करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजूकर :-** अहमदनगर महानगरपालिका सावेडी वसुली विभाग

उपरोक्त संदर्भिय विषयान्वे सावेडी हेड वसुली यांस कडुन विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की,वॉर्ड क्र.४९विल क्र ७८९ नगर मनमाडरोड या ठिकाणी सावेडी बस स्थानक आहे.त्यावरील आकारणी सन २००९/२०१० चे टाचण अभिलेख पहाता संपुर्ण पणे वाणिज्य दराने आकारणी झाल्याचे दिसून येते.सावेडी जुने बस स्थानक या मिळकतीबाबत जा क्र ५०५ दिनांक २४/११/२००९ या अन्यये दिनांक २६/११/२००९ रोजी या मिळकती बाबत रिव्हिजन विभाग या ठिकाणी राज्य परिवहन विभागाचे अधिकारी व सावेडी विभागाकडील हेड वसुली यांची मिटींग वरील विषया बाबत चर्चा मध्ये जुने बस स्थानक सावेडी ही जागा संपुर्ण पणे अकृषीक व पडीक आहे.त्याचे संपुर्ण क्षेत्रफळ रिव्हिजन अ फॉर्म वरून ३७७७२.७८ चौ.मी.इतके असुन त्यातील वाहन तळा करिता २००० चौ.मी.जाग वापरात आहे. व उर्व रित बांधकाम क्षेत्रफळ ११३.९५ चौ.मी.वजा जाता उर्ववरील ३५६५८.८३ चौ.मी.ऐवढी जागा कृषी जमीन व विनावापर पडीत क्षेत्र म्हणून करातुन वगळण्या बाबत संबंधित अधिकारी यांनी विनंती पत्राव्दारे कळविले आहे.

त्याच प्रमाणे त्यांनी सदर जागा अकृषीक असल्याबाबत अकृषीक आकारणी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ यांचे महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग परिपत्रक तसेच लेआवुटची झेरॉक्स व अप्पर आयुक्त,नागपुर विभाग यांनी पारित केलेले आदेश पत्राव्दारे जोडले आहे.

तरी सन २००९/२०१०चे टाचण अभिलेख पहाता आज अखेर त्यांना खुल्या जागेवर आकारणी झाल्याचे दिसुन येते त्यामुळे सदर अर्जदार यांचे अर्ज प्रमाणे व सध्यस्थिती पाहता सदरची जमीन ही अकृषीक व पडीक असल्याचे सदरचे मालमत्ता धारक यांचे बिल दुरूस्त करणे बाबत आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे हेड वसुली,सावेडी वसुली विभाग यांचा अहवाल असे.

यावर प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.१ यांचा अभिप्राय की,प्रस्तावाप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर रिव्हिजन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,प्रस्तुत प्रकरणातील जागा ही एस टी महामंडळाच्या मालकीची आहे.बसस्थानकांमध्ये बस ये जा करणे व प्रवाशांची चढ उतार करण्यासाठी २००० चौ.मी.जागा खुली ठेवण्यात आलेली आहे.त्यामध्ये ११३.९५ चौ.मी.चे बसस्थानकाचे बांधकाम आहे.सन १९९५-९६ मध्ये कराची आकारणी करतांना ११३.९५ चौ.मी.बांधकाम क्षेत्रावर व ३७७७२.७८ चौ.मी.या शेत जमिन क्षेत्रावर कराची आकारणी करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्र.एन ए.ए.३९८६ /८४(१५) २ मंत्रालय मुंबई १/९ मार्च १९८९ मधील बाब क्र.३ नुसार २००० चौ.मी.खुली जागा रस्त्याखाली जागा आहे.व ३५६५८.८३ चौ.मी.जागा शेत अमिन आहे.रस्त्याखाली येणारे २००० चौ.मी. उक्त परिपत्रकानुसार अकृषिक आकारातुन सुट दिलेली आहे.त्यानुसार मालमत्ता करामध्ये सुट देणे योग्य वाटते.

तसेच सावेडी बसस्थानकाच्या पश्चिमेस ३५६८५.८३ चौ.मी.या क्षेत्राची शेत जमीन आहे.त्या जमीनीच्या कोणताही वापर होत नाही.त्या शेत जमिनीवर कराची आकारणी झालेली आहे.तत्कालीन नगरपरिषद असतांना व महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर शेतजमीनीवर कराची आकारणी करण्यात आलेली नाही.त्याबाबत सन १९९५-९६ या वर्षात हरकत घेतलेली होती परंतु कोणताही विचार करण्यात आलेला नाही.

तरी सदर जमीनीवर केलेली कराची आकारणी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ मधील प्रकरण कराधान नियम २०(१) ड (फ) नुसार रद्द करून कलम १५२ नुसार सन २०१० -११ पर्यतची कराची रक्कम रू.१८०५९६२/- ही वसुल होणारी नसल्याने मा.स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करणेस हरकत नाही.तसेच ११३.९५ चौ.मी.या बांधिव क्षेत्रावर कराची आकारणी करून वसुल करणेस हरकत नाही.तथापी आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अहवाल की,वॉर्ड क्र.४९ बील नं.७८९,जुने सावेडी बस स्थानकाचा आकारणी बाबत.प्रभाग अधिकारी प्र.स.क्र.१ तसेच सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांचे अभिप्रायानुसार मान्यतेस.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,सहा.मुल्य निर्धारक तथा करसंकलन अधिकारी यांचे स्वाक्षरीनंतर जवळपास ३ वर्षा फाईल का सादर केली नाही याचा खुलासा कर निरीक्षक व प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.१ यांनी करावा.

सन १९९५-९६ ते २०१३-१४ अखेर मागणी,वसुल,सुट दयावयाची रक्कम,नविन करावयाची आकारणी इ.बाबत तक्यात महिती दयावी.

वसुल न होण्याची कारणे,वसुलीसाठी आपण केलेले प्रयत्न इ.निर्लेखित रक्कमा करणेसाठी आवश्यक आहे.

फेरसादर करावे.

यावर करनिरीक्षक व वसुली लिपीक यांचा अभिप्राय की, फेरसादर,सदर मालमत्ता ही मोकळया भुखंड स्वरूपात असल्याने महाराष्ट्र शासनाची परिपत्रक क्र.एन.ए.ए.३९८६/८४ (१५ ) ल -२ मंत्रायल मुंबई १/९ मार्च १९८९ मधील बाब क्र.३ नुसार २०७० चौ.मी.क्षेत्र रस्त्याखाली गेल्याने कर आकारणीत सुट दिलेली आहे.तसेच ३५६५८.८३चौ.मी.क्षेत्र शेतजमीन असल्याने कर आकारणीस पात्र होत नसल्याने तसेच सदर वॉर्डचे लिपीक वारंवार बदली झाल्या कारणाने प्रकरण सादर करण्यास निलंब झाला आहे.तसेच संबंधीत मालमत्ता संदर्भात कर आकारणीचे तक्ते सोबत जोडण्यात आले आहे.

संबंधीत मालमत्ता संदर्भात महाराष्ट्र प्रधीकरण यांच्याशी वारंवार थकबाकी करीता तगादे केले असता त्यांनी सदरचा कर हा शेत जमीनीवर लागला असल्या कारणाने रद्द करण्याबाबत अर्ज दिलेले आहेत.सदरचा कर वसूल न होण्या सारखा असल्याने निर्लेखित करणे उचित होईल असे वाटते.तथापी आदेशार्थ सविनय सादर.

यावर प्रभाग अधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रत्येक ३ वर्षानंतर फाईल / नस्ती सादर करण्यासाठी परंपरा कायत ठेवण्यात आली आहे.खेद वाटतो.

किती रक्कम (निश्चीत आकडा) आहे.मार्च २०१७ अखेर निर्लेखीत करावयाची आहे याचा आकडा नमुद नाही.

मे २०१७ अखेरची मागणी रक्कम किती,निर्लेखीत करावयाची आहे.यासह फेरसादर करा.

यावर करनिरीक्षक व वसुली लिपीक यांचा अभिप्राय की, सदर मालमत्ता कराची रक्कम सन १९९५-९६ ते मार्च २०१७ अखेर रू.५३,२६,५२१/- इतकी रक्कम निर्लेखित करणे बाबत व मार्च ते मे २०१७ अखेर शास्तीसह रक्कम ही वसूल न होण्यासारखी असल्याने तसेच सदर चा कर हा शेतजमीनीवर लागला असल्या कारणाने निर्लेखित करणे उचित होईल.असे वाटते.तथापी आदेशार्थ सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रभाग अधिकारी यांनी प्रस्तावित केलेनुसार व सोबतच्या तक्त्यान्वये म.रा.प.मं.च्या सावेडी बस स्थानक ( मनमाड रोड) येथील जागा N.A.नाही.करिता वसूल न होण्याजोगी संपुर्ण रक्कम असलेले,नमुद रक्कम रू.५३,२६,५२१/- ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ प्रमाणे वसुल न होण्याजोगी असल्याने निर्लेखित करणे योग्य राहील.मा.स्थायी समितीच्या मंजूरीने मा.आयुक्तास असे निर्लेखित करता येते करिता प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेत पाठविणेस हरकत नाही.मे.आदेशार्थ स.सादर.

यावर मा.अतिरीक्त आयुक्त यांचा अभिप्राय की,सोबतच्या सविस्तर अहवालामधील 'अ' प्रमाणे प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका यांच्या मंजुरीने सावेडी जुने बसस्थानक बिल क्रमांक ७८९ वर आकारणी करण्यात आलेली घरपटटीची रक्कम रूपये ५३,२६,५२१/- शास्तीसह रक्कम निर्लेखित करणेबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.दिलीप सातपुते:- कशा मुळे घरपट्टी निर्लेखीत करावायाची आहे.काय कारण? आपल्याला कोणी पैसे सोडते का? या विषयाची सविस्तर माहिती सांगा.

प्रभाग अधिकारी प्र.स.क्र१ श्री.सारसर :- या मिळकती बाबत रिव्हिजन विभाग या ठिकाणी राज्य परिवहन विभागाचे अधिकारी व सावेडी विभागाकडील हेड वसुली यांची मिटींग वरील विषया बाबत चर्चा मध्ये जुने बस स्थानक सावेडी ही जागा संपुर्ण पणे अकृषीक व पडीक आहे.त्याचे संपुर्ण क्षेत्रफळ रिव्हिजन अ फॉर्म वरून ३७७७२.७८ चौ.मी.इतके असुन त्यातील वाहन तळा करिता २००० चौ.मी.जाग वापरात आहे. व उर्व रित बांधकाम क्षेत्रफळ ११३.९५ चौ.मी.वजा जाता उर्ववरील ३५६५८.८३ चौ.मी.ऐवढी जागा कृषी जमीन व विनावापर पडीत क्षेत्र म्हणून करातुन वगळण्या बाबत संबंधित अधिकारी यांनी विनंती पत्राव्दारे कळविले आहे. सदर जागा अकृषीक असल्याबाबत अकृषीक आकारणी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ यांचे महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग परिपत्रक तसेच लेआवुटची झेरॉक्स व अप्पर आयुक्त,नागपुर विभाग यांनी पारित केलेले आदेश त्यानुसार सदरचा कर वसूल न होण्या सारखा असल्याने निर्लेखित करणे उचित होईल असे वाटते.

मा.बाळासाहेब बोराटे :- किती रक्कम आहे.

प्रभाग अधिकारी प्र.स.क्र१ श्री.सारसर :- घरपटटीची रक्कम रूपये ५३,२६,५२१/- इतकी आहे.

मा.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजरू करण्यात यावा.

मा.श्री.मुदस्सर शेख :- घरपट्टी निर्लेखित करण्याचे विषय असल्याने मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका यांच्या मंजुरीने सावेडी जुने बसस्थानक बिल क्रमांक ७८९ वर आकारणी करण्यात आलेली घरपटटीची रक्कम रूपये ५३,२६,५२१/- शास्तीसह रक्कम निर्लेखित करणेबाबत ऑफिस रिपोर्ट आहे.आणि शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका यांच्या मंजुरीने सावेडी जुने बसस्थानक बिल क्रमांक ७८९ वर आकारणी करण्यात आलेली घरपटटीची रक्कम रूपये ५३,२६,५२१/- शास्तीसह रक्कम निर्लेखित करण्यास ही सभा मान्यता देत आहे. आणि शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब बोराटे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिति
अहमदनगर महानगरपालिका